सदरचा वृत्तांत

दि.  /  /२००

रोजी टंकलेखनासाठी दिला.

# पुणे महानगरपालिका

नगरसचिव

**स्थायी समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक १, दिनांक २/०४/२०१४**

**सभा क्रमांक १, दिनांक २/०४/२०१४ चा वृत्तांत**

विषय क्र. ०१ ते १८

दाखल वि. क्र. – १९

ठराव क्र. – ०१ ते १९

स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २/०४/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम – अध्यक्ष

२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत | १०. | मा.मुळीक योगेश तुकाराम |
| ४. | मा.सौ.ओरसे शारदा शंकर | ११. | मा.सौ.मोहोळ मोनिका मुरलीधर |
| ५. | मा.केमसे शंकर दत्तात्रय | १२. | मा. राणे अनिल बाबूराव |
| ६. | मा.ॲड.छाजेड अभय भाकचंद | १३. | मा.रासने हेमंत नारायण |
| ७. | मा.तुपे चेतन विठ्ठलराव | १४. | मा. सौ. लोणकर नंदा नारायण |
| ८. | मा. तुपेरे राहूल बापू | १५. | मा.सौ.व्यवहारे कमल ज्ञानराज |
| ९. | मा.धंगेकर रविंद्र हेमराज | १६. | मा.सुतार पृथ्वीराज शशिकांत |

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. | मा. | मा. | मा. |
| मा. | मा. | मा. | मा. |

लघुलेखक :–

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. विकास देशमुख , महापालिका आयुक्त | २६. | मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२) |
| २. | मा. , अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.) | २७. | मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी |
| ३. | मा. ओमप्रकाश बकोरिया,अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि.) | २८. | मा.शिवाजी दौंडकर सल्लागार (कामगार) |
| ४. | मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ) | २९. | मा.विजय दहीभाते, उपायुक्त (वि.का.१) |
| ५. | मा.डॉ.प्रवीण आष्टीकर, अध्यक्ष व सह. व्यव. संचालक,पीएमपीएमएल | ३०. | मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२) |
| ६. | मा.सुनिल पारखी, नगरसचिव | ३१. | मा.सुरेश जगताप, उपायुक्त (वि.का.३) |
| ७. | मा.हनुमंत नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.) | ३२. | मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.४) |
| ८. | मा.अंबरिष गालिंदे,सह आयुक्त (लेखापरिक्षक) | ३३. | मा.प्रमोद यादव, उपायुक्त (वि.का. घनकचरा व्यवस्थापन) |
| ९. | मा. हेमंत निकम,(कआ. व क.सं. प्रमुख) | ३४. | मा.आर.टी.शिंदे, उप आयुक्त (भु.जि.) |
| १०. | मा.डॉ.प्रविण आष्टीकर, उपायुक्त (विशेष) | ३५. | मा.प्रमोद निरभवणे, अति.नगर अभियंता (पथ) |
| ११. | मा.मोरे दगा पितांबर, उपायुक्त (ग.व.नि.) | ३६. | मा.श्रीनिवास कंदूल, (कोठी प्रमुख) |
| १२. | मा. उपायुक्त (जिं.घ.) | ३७. | मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत) |
| १३. | मा.मंगेश जोशी, उपायुक्त (जनरल)(सेवकवर्ग) | ३८. | मा.ना.न.बारापात्रे, (विकास अभियंता, पथ) |
| १४. | मा.सुनिल केसरी, उपायुक्त (तांत्रिक) | ३९. | मा.संदीप खांदवे, कार्यकारी अभियंता(भवन) |
| १५. | मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख | ४०. | मा.विजय कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प) |
| १६. | मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखापाल | ४१. | मा.मदन आढारी, अधीक्षक अभियंता |
| १७. | मा. विलास कानडे, आयातकर प्रमुख | ४२. | मा.अब्बास पटेल, अधीक्षक अभियंता |
| १८. | मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता | ४३. | मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी |
| १९. | मा.विवेक खरवडकर, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ ) | ४४. | मा.सुधाकर देशमुख, विशेष कार्याधिकारी (दक्षता) (सांख्यिकी व संगणक) |
| २०. | मा. , शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि. | ४५. | मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो) |
| २१. | मा.तुकाराम सुपे, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ | ४६. | मा. माधव जगताप, सहा. आयुक्त, घोले रोड |
| २२. | मा.ॲड.मंजूषा इधाटे, प्र.विधी सल्लागार | ४७. | |
| २३. | मा.रमेश शेलार, मुख्य सुरक्षाअधिकारी तथा अतिक्रमण विभाग प्रमुख | ४८. | |
| २४. | मा.अशोक घोरपडे, मुख्य उद्यान अधिक्षक | ४९. | |
| २५. | मा.मंगेश जोशी, उपायुक्त (समाजकल्याण) | ५०. | |

प्रथम सभा क्र. , दि. / /२० ते सभा क्र. , दि. / /२० चे वृत्तांत कायम करावेत असे सर्वानुमते ठरले व त्यानंतर मा.अध्यक्ष यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या. पुरेश्या गणसंख्येअभावी सभेचे कामकाज झाले नाही.

सोबतची तहकुबी घेणे.

# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक १, दिनांक २/०४/२०१४**
**सभा क्रमांक १, दिनांक २/०४/२०१४ चा वृत्तांत**

मा. अध्यक्ष – सभेला सुरूवात करण्यात यावी.
मा. नगरसचिव – सभेला सुरूवात करण्यात येत आहे.

**– दाखल विषय –**

**विषय क्र. १९ त्वर्य**

पुणे शहरातील सर्व नागरिकांचे, व्यावसायिकांचे नामफलक लावण्यासाठी मनपाने दि. ३१ मार्च २०१४ पर्यंत शुल्क आकारुन परवानगी घ्यावी अन्यथा दि. १ एप्रिल २०१४ पासून पाच पट दंड आकारुन सदरचे नामफलक नियमित करण्यात येतील अशा नोटीसा संबंधितांना दिल्या होत्या. तरी सदरच्या नोटींशींमध्ये दिलेल्या दि. ३१ मार्च २०१४ च्या मुदतीऐवजी दि. ३१ मे २०१४ पर्यंत सदरचे नामफलक नियमित करण्यास व दि. १ जून २०१४ पासून दंडात्मक कारवाई करण्यास तसेच पहिल्यांदाच सदरची योजनेची सुरुवात असल्यामुळे चालू वर्षासाठीच सदरची मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात यावी याबाबत मा.पृथ्वीराज सुतार, मा.सौ.मोनिका मोहोळ, मा.सौ.शारदा ओरसे व मा.सौ.राजश्री आंदेकर यांचे दि.२/४/२०१४ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करुन सर्वानुमते मान्य झाला.**

मा. अलगुडे मुकारी – मा. अध्यक्ष, आता जी कामे चाललेली आहेत त्या संदर्भात बोलायचे होते. कामे अर्धवट स्थितीत आहेत, पूर्ण होत नाहीत आणि ठेकेदारांची बिले झालेली नाहीत ती झालेली असताना ती स्विकारली जात नाहीत. जी कामे अर्धवट आहेत, पूर्ण झालेली नाहीत त्याबद्दल आपले काय म्हणणे आहे?
मा. महापालिका आयुक्त – आपल्याकडे चीफ अकाउंट ऑफिसरकडे जी बिले आलेली आहेत, त्यामध्ये त्यांनी शेवटच्या तारखेपर्यंत १२.०० वाजेपर्यंत बिले घेतलेली आहेत, अजून जवळपास १८०० बिले फिड करणे बाकी आहेत. मी मागे सांगितल्याप्रमाणे जसे आपले उत्पन्न किती आहे आणि आपल्याला किती बिले खर्ची टाकता येतील याचा विचार करूनच आपल्याला पुढील विचार करावा लागणार आहे. आताच्या परिस्थितीत जी काही बिले आलेली आहेत त्याच्या आधारावर ती आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त होत आहेत, त्यामध्ये आपल्याला फार काही करता येणार नाही.
मा. अलगुडे मुकारी – कामे झालेली आहेत पण ते बिले स्विकारत नाहीत. ज्यांची कामे पूर्ण झाली आहेत त्यांना बिले अदा करणे आपल्याला भाग आहे.
मा. महापालिका आयुक्त – २९ तारखेपर्यंत जी बिले आली आहेत ती त्यांनी स्विकारली आहेत.
मा. अनिल राणे – आता महिनाअखेरीस दोन दिवस सुट्टया आल्या होत्या त्यामुळे त्यांना थोडासा वेळ द्यायला पाहिजे. इलेक्शन डयुटी असल्यामुळे आपले काही कर्मचारी आणि अधिकारी जागेवर नाहीत.
मा. अध्यक्ष – इलेक्शन डयुटी असल्यामुळे आणि स्टाफ जागेवर नसल्यामुळे बिले काढायला वेळ लागला असाही प्रकार आहे.
मा. महापालिका आयुक्त – बिले घेवून आपल्याकडे पैसे असायला हवेत, फक्त बिले घेवून आपण काय करणार आहोत? आपले उत्पन्न किती आहे त्यावर आपल्याला ठरवावे लागेल.
मा. अनिल राणे – बजेट तरतूद असताना वर्क ऑर्डर उशीरा का दिली? कामे का उशीरा सुरू झाली? याबद्दल आम्हांला तुम्ही खुलासा दिला पाहिजे, त्यामध्ये आमचा काय दोष आहे? बजेटमध्ये वर्गीकरण न करता त्यासाठी तरतूद असेल आणि मार्च महिन्याच्या शेवटी जर ते काम सुरू होत असेल तर त्याची कारणे संबंधित खात्याने सांगून त्याबद्दल खुलासा करावा, त्यात आमचा काय दोष आहे? जर वर्क ऑर्डर द्यायला १२ महिने लागत असतील तर त्यामध्ये दोषी कोण आहे?
मा. अलगुडे मुकारी – त्यांची बिले घेणे आपल्याला भाग आहे, ती स्विकारायला पाहिजेत.
मा. कळसकर, मुख्य लेखापाल – आता आपण स्विकारू शकत नाही. आपल्याला २९ तारखेपर्यंतच स्विकारता येतील.
मा. अलगुडे मुकारी – ज्यांची कामे पूर्ण झालेली आहेत त्यांचे आपण काय करणार आहोत?
मा. कळसकर, मुख्य लेखापाल – त्यांचा आपण नंतर निर्णय घेऊ.
मा. अलगुडे मुकारी – आता कसा काय निर्णय घेणार, त्यांनी ज्यांच्याकडून बाजारात माल घेतला आहे ते लोक गप्प बसणार आहेत का?
मा. कळसकर, मुख्य लेखापाल – मा. अध्यक्ष, आपण जवळपास १ ते १.५ महिना अगोदर पासून हे सांगितले होते, की २९ तारखेपर्यंतचीच बिले स्विकारली जातील आणि अदा केली जातील.
मा. अलगुडे मुकारी – मग यामध्ये चूक कोणाची आहे?

मा. अनिल राणे – आपण ज्या वर्क ऑर्डर फेब्रुवारी आणि मार्च महिन्यामध्ये दिल्या आहेत त्यावर आपण दोन ते चार महिन्यांची मुदत का टाकून दिली? वर्क ऑर्डर दिली आणि त्यावर जर काम सुरू झाले असेल आणि अशी मुदत जर टाकून दिली असेल तर त्याचा अर्थ काय?

मा. अलगुडे मुकारी – ठेकेदारांनी जर बाजारातून मटेरियल खरेदी केले असेल तर त्यांना पेमेंट करायला लागेल.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – आपल्याकडे ज्या कामांसाठी स्पिलची उपलब्धता असेल त्याला स्पिलमधून खर्च करावा लागेल पण ज्याला स्पिलची उपलब्धता नसेल आणि समजा 'स' यादीतून किंवा इतर यादीतून असेल तर ते आपल्याला चालू वर्षाच्या तरतूदीतून करून घ्यावी लागतील. ज्यांना कोणाला वर्क ऑर्डर मिळालेली आहे, काम चालू झाले आहे, ते काम होणार आणि चालू वर्षात जर बिले खर्ची पडत नसतील तर पुढील वर्षाच्या बजेटला आपल्याला पैसे द्यावे लागतील.

मा. अलगुडे मुकारी – पण मागील वर्षाच्या बजेटमध्ये जर कामे झाले असतील तर त्याचे काय करणार?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – तेवढे पैसे आपल्याकडे शिल्लक नाहीत. आपल्याकडे २९०० कोटी रूपये उपलब्ध झाले आहेत आणि ३००० पेक्षा जास्त बिले आपल्याकडे सबमिट झालेली आहेत.

मा. अलगुडे मुकारी – आता ज्या ठेकेदारांची बिले तयार आहेत त्यांनी काय करायचे, त्यांनी काय जीव द्यायचा का?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – त्यांना पैसे मिळणार आहेत.

मा. अलगुडे मुकारी – तुम्ही एक–दोन महिन्यानंतर पैसे दिल्यावर कसे चालेल? त्यांना एप्रिल महिन्यात बिले अदा करावी लागतात.

मा. पृथ्वीराज सुतार – आता आपण काय धोरण ठरविले आहे? म्हणजे कामाचे स्वरूप कसे असणार आहे?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – आता आपल्याकडे एकंदरीत २९०० कोटी रूपये जमा झालेली बाजू आहे, आणि आपल्याकडे जी खर्चाची बिले आलेली आहेत ती ३००० कोटीच्या वर आलेली आहेत म्हणजे आपण १०० कोटीपर्यत डेफिसीटमध्ये जात आहोत. मागच्या वर्षी आपण जो ताळेबंद केला त्यात आपण १३०–१५० कोटी रूपये प्लसमध्ये होतो. आपण ज्यांना वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत त्या अनुशंगाने स्पिलसाठी उपलब्धता असेल त्यांना स्पिलमधून पेमेंट करता येते, ते पेमेंट आपल्याला लगेच करता येईल त्याला आपल्याला अडचण नाही परंतू ज्यांच्याकडे बजेटचे हेड नसेल, बजेटमध्ये तरतूद नसेल त्यांना तरतूद उपलब्ध करून द्यावी लागेल. मुख्य खात्याचे काम असेल तर मुख्य खात्याला आणि सभासदाचे काम असेल तर सभासदाला तरतूद उपलब्ध करून द्यावी लागेल.

मा. अलगुडे मुकारी – आता जी कामे चालू आहेत, ती अर्धवट स्थितीत आहेत.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – ती कामे होतील आणि त्याचे पैसेही त्यांना मिळतील.

मा. पृथ्वीराज सुतार – सभासद कोण उपलब्ध करून देणार?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – आपल्याकडे मा. आयुक्तांनी केलेले बजेट हेड आहे त्यावर आपण स्टँडिंग कमिटी आणि जनरल बॉडीमार्फत मान्यता देतो. त्यामध्ये आपण वाढ करताना उपलब्धता करून घेतो त्यामध्ये काही ठिकाणी कट केलेले असतात तर काही ठिकाणी पैसे वाढवलेले असतात. आज जर आपल्या महानगरपालिकेकडे ३००० कोटीची बिले खर्ची पडण्यासाठी आलेली आहेत त्याऐवजी जर ४००० कोटीची बिले आली असती तर आपण १००० कोटी रूपये कोठून आणले असते? आपल्या उत्पन्नापेक्षा आपली १०० कोटीची खर्चाची बिले जास्त आहेत ती आपल्याकडे २९ मार्च सायंकाळपर्यंत उपलब्ध आहेत. यामध्ये आपण ३० आणि ३१ मार्चची सुट्टीच्या दिवशीची बिले यामध्ये धरलेली नाहीत.

मा. पृथ्वीराज सुतार – यामध्ये बरीचशी कामे उशीरा सुरू झाली त्याची जबाबदारी कोणाची आहे? कामे उशीरा सुरू झाली त्यात आमचा दोष नाही, ती खात्याची जबाबदारी आहे. काही कामे अशी आहेत की, ती पूर्ण करणे गरजेचे आहे. उदा. रस्ता, आज संपूर्ण पुणे शहरात कुठे ना कुठे कॉंक्रीट रस्त्याची कामे सुरू आहेत आणि ती जवळपास ४० ते ५०% झालेली आहेत ती कामे पूर्ण करणे गरजेचे आहे, ती आपल्याला अर्धवट सोडता येणार नाहीत. या कामांवरच इतरही कामे अवलंबून होती, हे आम्ही प्रत्येक वेळी सांगत आहोत. आपण सांगत आहात कामे अर्जीला घेतली असतील पण जी घेतली नाहीत त्यांचे काय करायचे? आपण आता कुठलेही काम थांबवणार नाही, काम पूर्ण करणार असे म्हटले आहे आणि ज्या कामांना अर्जी नसेल त्या कामांसाठी आपण वर्गीकरण उपलब्ध करून घेणार आणि ती कामे करणार असे आपले ठरले आहे.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – वर्गीकरण म्हणजे आपण चालू बजेटला करणार.

मा. पृथ्वीराज सुतार – चालू बजेटमध्येच द्यावे लागणार आहे.

मा. अलगुडे मुकारी – आताची जी बिले आहेत ती स्विकारायला पाहिजेत.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – आता ती पुढील वर्षात स्विकारावी लागतील मागील वर्षात स्विकारता येणार नाही कारण मागील वर्ष आता क्लोज झाले आहे. ज्यांना वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत त्यांना बिले मिळणार आहेत.

मा. अलगुडे मुकारी – वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत, कामे पूर्ण झालेली आहेत, त्यांची बिलेही तयार झालेली आहेत.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – ३१ मार्चनंतर जी बिले आलेली आहेत ती चालू वर्षात घ्यावी लागणार आहेत, ते या नवीन वर्षातच पे केले जाणार आहे मागील वर्षात होणार नाही.

मा. सौ. मोनिका मोहोळ – त्यासाठी किती दिवस लागतील?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – एक ते दोन महिने लागतील, आपण मागील वर्षी तसेच केले होते, कारण जोपर्यंत आपल्याकडे टॅक्सचे ३०० ते ४०० कोटी रूपये जमा होत नाहीत तोपर्यंत पैसे देता येणार नाहीत.

मा. अलगुडे मुकारी – आता ठेकेदाराने काय मरायचे का? त्याला बाजारात पेमेंट द्यायचे आहे.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – मागील वर्षात आपण तसेच केले होते, एप्रिल–मे महिन्यात बिलाचे पैसे पे करत होतो.

मा. पृथ्वीराज सुतार – मागच्या वेळी आपण सगळी एकदम नाही, पण जी महत्वाची कामे आहेत आणि जी अर्धवट आहेत अशा कामांची यादी करून त्यासाठी पैसे उपलब्ध करून दिले होते.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – ते अजून आपल्याला करायचे आहे, आज तीनच दिवस झालेले आहेत. आज आपल्याकडे जो टेंटेटीव आकडा आला आहे त्यावर आपण बोलतो आहे. आपल्याकडे रेव्हेन्यूचा आकडा जास्त आला आहे असे आपल्या लक्षात आल्यानंतर आपण लगेच ते पैसे देऊ शकतो.

मा. पृथ्वीराज सुतार – त्यांचे म्हणणे असे आहे की, तुम्ही किमान बिले तर स्विकारा. त्यासाठी तुम्ही वेगळे रेकॉर्ड ठेवा आणि ती बिले पाहिजे असेल तर १५ दिवसानंतर स्विकारा.

मा. अलगुडे मुकारी – बिले स्विकारा आणि पेमेंट नंतर करा, बिले स्विकारणे आपल्याला भागच आहे.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – चालू आर्थिक वर्षात पेमेंट करता येईल.

मा. पृथ्वीराज सुतार – आपण बिले स्विकारण्यासाठी पुढे १५ दिवस मुदतवाढ द्यायचो. आपण पूर्वी ६–६ महिने मुदतवाढ द्यायचो आता ३–४ वर्षापासून ते आपण बंद केले आहे.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – कधीही महानगरपालिका मायनसमध्ये गेलेली नाही. मागील वर्षी आपण १३० कोटी प्लसमध्ये होतो. आज आपल्याकडे एकंदरीत १०० कोटीची बिले उत्पन्नापेक्षा जास्त आलेली आहेत.

मा. अलगुडे मुकारी – उद्या एखादा ठेकेदार कोर्टात गेला तर त्याला तुम्ही काय उत्तर देणार?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – ३१ तारखेपर्यंत आलेली बिले आपण सबमिट करून घेतली होती.

मा. अलगुडे मुकारी – बजेट नसताना खात्याने काम करून घ्यायचे नव्हते.

मा. पृथ्वीराज सुतार – आपली अगोदर काय सिस्टीम होती? तीन ते चार वर्षापर्यंत काय सिस्टीम होती?

मा. सौ. कळसकर, मुख्य लेखापाल – पूर्वी म्हणजे ७–१० वर्षापर्यंत जर आपण पाहिले तर कायम आपल्याकडे टॅक्स जास्त आणि खर्च कमी होता.

मा. पृथ्वीराज सुतार – आपण पूर्वी ७–८ महिने बजेटनंतर पुढे वेळ दिला होता.

मा. अलगुडे मुकारी – यामध्ये खात्याचीही चूक आहे, टेंडर लवकर काढत नाहीत. मुदत संपत आल्यानंतर घाईघाईने टेंडर काढतात, त्यामुळे आपले सर्व लोक अडचणीत येतात.

मा. सौ. कळसकर, मुख्य लेखापाल – मागील काही वर्षात आपले उत्पन्न जास्त होते.

मा. अलगुडे मुकारी – मा. अध्यक्ष, बिले स्विकारायला सांगा, बिले स्विकारायला काय हरकत आहे?

मा. पृथ्वीराज सुतार – कामे चालू ठेवायला सांगा, रस्ते कसे काय अर्धवट ठेवणार?

मा. महापालिका आयुक्त – कामे चालू ठेवली तर या वर्षीच्या बजेटमध्ये पैसे देता आले नाहीतर त्यासाठी पुढच्या वर्षाच्या बजेटला तरतूद करावी लागेल.

मा. पृथ्वीराज सुतार – वर्क ऑर्डर दिलेली आहे आणि जी कामे चालू आहेत ती कोणतीही कामे बंद करू नयेत असे तुम्ही सांगा. पाऊस सुरू झाल्यानंतर कशी कामे करणार आहेत? त्यामुळे भयानक परिस्थिती निर्माण होईल. कामे अर्धवट सोडली तर लोक आम्हांला विचारतील.

मा. अलगुडे मुकारी – जी अर्धवट कामे आहेत ती पूर्ण व्हायलाच पाहिजेत.

मा. महापालिका आयुक्त – हे नवीन यंदाच बजेट झालेले नाही, ही दरवर्षीचीच पध्दत आहे. आपण २० एप्रिलनंतर उत्पन्नाचे मार्ग पाहून त्यावर ठरवू.

मा. पृथ्वीराज सुतार – कामे बंद झालेली नाहीत.

मा. महापालिका आयुक्त – गेल्या वर्षी काय केले होते ते सांगा, की यंदा काही नवीन मुद्दा उपस्थित झाला असे नाही.

मा. पृथ्वीराज सुतार – तुम्ही कामे कुठे बंद ठेवली आहेत?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – कामे बंद केलेली नाहीत. एकदा वर्क ऑर्डर दिल्यानंतर कामे सुरूच राहिली पाहिजेत, त्या कामाचे पैसे देण्याची जबाबदारी महानगरपालिकेचीच राहणार. त्या कामासाठी तरतूद मुख्य खात्यातून झाली असेल तर मुख्य खात्यातून चालू वर्षी होईल, स्पिलमध्ये असेल तर स्पिलमधून होईल, 'स' यादीतून असेल तर त्यासाठी तरतूद करावी लागेल. कामे चालू आहेत ती करावीच लागतील, पाहिजे तर नवीन दोन कामे कमी करू, पण जी कामे चालू आहेत ती पूर्ण करू.

मा. अध्यक्ष – आता जी कामे चालू आहेत ती पूर्ण केली पाहिजेत आणि ती करू असा जो व्यवहार्य निर्णय घेतला, त्याचबरोबर जी कामे पूर्ण झाली आहेत, आणि त्यांची बिले आपल्याकडे आली आहेत ती बिले आपल्याला स्विकारली पाहिजेत. पेमेंट कधी करायचे हा मुद्दा प्रशासनाचा तांत्रिक मुद्दयावर असेल. आपण जरी बिले स्विकारली नाही तरी आपल्याला त्या बिलाचे पेमेंट आज ना उद्या करणे भागच आहे, ती बिले आपल्याला स्विकारायला पाहिजे. त्याचे पेमेंट कधी करायचे ते तुम्ही तांत्रिक मुद्दयावर सॉल्व्ह करून घ्या. तुम्ही जर आज बिले स्विकारली नाहीत आणि १५–२० दिवसानंतर स्विकारली तर त्यामध्ये अजून मोठया प्रमाणात वाढ होऊ शकते हा देखील विचार करायला हवा.

मा. महापालिका आयुक्त – आता आपण जो निर्णय घेतला की, जी कामे अर्धवट आहेत ती चालूच ठेवायची तर त्याची बिले आपल्याला केव्हा ना केव्हा द्यावीच लागणार आहेत. प्रश्न एवढाच आहे की, ३१ मार्चच्या आतील म्हणून बिल स्विकृत करता येणार नाही. पुढच्या वर्षीच्या बजेटमध्ये वर्गीकरण करून आपण देऊ.
मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – झोनल कमिशनर आता तुमच्या लेवलला काही बिले पेंडींग आहेत का?
मा. मोळक, उपायुक्त (वि.का.२) – आता रनिंग केलेली बिलेच आहेत.
मा. पृथ्वीराज सुतार – आता कामे कुठलीच पूर्ण झालेली नाहीत, जी कामे पेंडींग आहेत त्याचीच रनिंग बिले पुढे चालू आहेत. जी कामे पूर्ण झाली आहेत त्यांचे पैसे मिळाले आहेत आणि त्यांची बिलेही पूर्ण झालेली आहेत.
मा. महापालिका आयुक्त – ३१ मार्चच्या आतील बिले आता स्विकारता येणार नाहीत. त्याने जे काम केले आहे त्याला बिलाचे पैसे देणे आपल्याला भाग आहे. आता आपल्याला झालेला उत्पन्न आणि खर्च याचा मेळ तुम्ही घ्या. आता २९ मार्चपर्यंत किंवा ३१ मार्चपर्यंत जी बिले आलेली आहेत ती तुम्ही फिड करा आणि त्यानंतर दोन ते चार दिवसानंतर तुम्ही ती बिले स्विकारा परंतू ती चालू वर्षामध्ये घ्यावी लागतील. एकदा आपल्याला उत्पन्नाचा अंदाज आल्यानंतर आपल्याला ठरविता येईल की किती मुदतवाढ द्यायची वगैरे पण तो मुद्दा आज आपल्याला काही बोलता येणार नाही. परंतू जे काम झाले आहे त्याची रिस्पॉन्सीबिलीटी आपलीच आहे, ती पुढील वर्षामध्ये आपण वेगवेगळया मार्गाने पे करू.
मा. सौ. शारदा ओरसे – मा. अध्यक्ष, झोन क्र. १ मध्ये किती कामे पूर्ण झालेली आहेत आणि किती कामे पूर्ण व्हायची राहिली आहेत? याची माहिती सांगा. त्यामध्ये किती कामे चालू आहेत आणि अर्धवट आहेत आणि किती पूर्ण झाली आहेत? याबद्दलची यादी आम्हांला द्या.
मा. केसरी, उपायुक्त (वि.का.) – ९८% कामे पूर्ण झालेली आहेत. पूर्ण कामांची यादी देतो.
मा. अलगुडे मुकारी – मा. अध्यक्ष, मागील मिटींगमध्ये मी पाण्याच्या पाईपलाईनबद्दल माहिती विचारली होती ती द्यायला सांगा. त्या ठिकाणी काम चालू आहे की बंद आहे?
मा. आढारी, अधिक्षक अभियंता – मा. अध्यक्ष, त्या ठिकाणी एस.आर.ए. स्किम आहे. एस.आर.ए. स्किममधून आपली ३६ इंची लाईन जाते, त्या लाईनसंदर्भात एस.आर.ए. खात्याला आणि बांधकाम खात्याला आमच्या पाण्याच्या लाईनला कुठल्याही प्रकारचा धोका होऊ नये याबाबत काळजी घेण्यासंदर्भात पत्र दिलेले आहे.
मा. अलगुडे मुकारी – मी एक वर्षापूर्वी तुमच्या खात्याला पत्र दिले होते त्यावेळी तुमच्या लक्षात आले नाही का? त्यावेळी तुम्ही एस.आर.ए. खात्याला का कळविले नाही?
मा. आढारी, अधिक्षक अभियंता – एस.आर.ए. खात्याने ज्यावेळी खोदाई केली आणि ती लाईन एक्सपोज झाली त्यावेळी सक्शेक्षणची लाईन आहे, ती झोपडपट्टीच्या खालून जात होती आणि ज्यावेळी ती एक्सपोज झाली त्यावेळी ती लक्षात आली की ती खोदाईच्या मध्ये आलेली आहे ...
मा. अलगुडे मुकारी – नाही, झोपडपट्टी नाही तो प्रायव्हेट प्लॉट आहे त्या ठिकाणी लोक राहत होते म्हणून ते घोषित केले आणि त्या ठिकाणाहून ३६ इंची लाईन गेली आहे हे सर्वांना माहिती आहे.
मा. आढारी, अधिक्षक अभियंता – ज्यावेळी ती लाईन एक्सपोज झाली त्यावेळी ते लक्षात आल्यानंतर खात्याला कळविण्यात आलेले आहे.
मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – काम तिथे जाईपर्यंत त्यांनी कळविलेले आहे. बांधकाम विभागाने त्यांच्याकडून काही लिहून घेतले आहे का? तुमचा इंजिनिअर त्या साईटवर गेला आहे का? आता सध्या पाईपला धोका आहे का?
मा. आढारी, अधिक्षक अभियंता – आपण त्यांना पत्र दिले आहे की, पाईपला कुठल्याही प्रकारचा धोका होणार नाही अशा पध्दतीने काळजी घ्या.
मा. अलगुडे मुकारी – मा. अध्यक्ष, एस.आर.ए. मध्ये प्लॅन पास होतो आहे, मी एक वर्षापूर्वी पत्र दिलेले आहे मग एस.आर.ए. ला या लोकांनी का कळविले नाही. सदर ठिकाणी या भागातून ३६ इंची लाईन जात आहे याबाबत आपण संबंधित खात्याशी चर्चा करून पुढील कारवाई करावी किंवा नाही याबाबत त्यांनी कळवायला हवे होते. उद्या त्या ठिकाणी काही धोकादायक घटना घडली तर त्याला जबाबदार कोण राहणार?
मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – काम सुरू झाले, त्यावेळी त्यांनी ऑलरेडी कारवाई सुरू केलेली आहे.
मा. अलगुडे मुकारी – कारवाई नाही, त्यांना काम बंद ठेवायला सांगा आणि आपल्या बांधकाम खात्यामध्ये मिटिंग घेवून चर्चा करायला सांगा. काम ताबडतोब बंद करायला सांगा.
मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – एस.आर.ए. बरोबर एक जॉईंट मिटिंग ठेवा.
मा. महापालिका आयुक्त – काम सुरू झालेले आहे का?
मा. आढारी, अधिक्षक अभियंता – खोदाई सुरू झालेली आहे आणि खोदाईच्या साईट मार्जिनला ती लाईन आहे ती थोडीशी एक्सपोज झालेली आहे, आणि त्या ठिकाणी काही धोका होणार नाही याबाबत त्यांना दक्षता घ्यायला सांगितले आहे.
मा. अलगुडे मुकारी – एस.आर.ए. चा प्लॅन पास करण्यासाठी मा. महापालिका आयुक्त ऑर्डर करतात. मग आपल्या खात्याने मा. आयुक्तांना आणि एस.आर.ए. ला कळवायला पाहिजे होते. त्यांच्याबरोबर एक बैठक घेवून, डिसीजन घेवून ताबडतोब काम बंद करायला सांगा. ती ३६ इंची मोठी लाईन आहे कधीही स्फोट होऊ शकतो. त्या प्लॉटमधून आपली लाईन गेलेली आहे. ते धोकादायक होऊ शकते. हेल्थ कँपमध्ये अशीच लाईन फुटली होती.

मा. खरवडकर, अति. नगर अभियंता (पथ) – मा. अध्यक्ष, हा विषय असा आहे की, आपला वॉटर सप्लाय किंवा कुठल्याही युटिलीटीची एखादी गोष्ट एस.आर.ए. मध्ये घडत आहे. एस.आर.ए. च्या माध्यमातून पुनर्विकास होत असेल तर युटीलीटीचे प्रोटेक्शन करण्याबाबतचा हा विषय आहे. ते प्रोटेक्शन करायला पूर्वी देखील पाणीपुरवठयाची लाईन टाकताना त्या जेव्हा बिल्डिंगमधून जाताना मेजर्स घेवून, वाईड ओपन ठेवून डक करतो त्या पध्दतीने वॉटर सप्लायच्या एन.ओ.सी. शिवाय एस.आर.ए. ने हे करता कामा नये. अशीच मागणी मा. सभासदांची आहे तर आपण एस.आर.ए. शी संपर्क साधून ताबडतोब त्याचे निराकरण करू. वॉटर सप्लाय डिपार्टमेंटशी बोलून त्यांच्या सल्ल्यानुसारच एस.आर.ए. ने ते काम करायला पाहिजे.

मा. अलगुडे मुकारी – त्यांनी काम सुरू करण्याअगोदरच त्याबाबतचा डिसीजन घ्यायला पाहिजे होता?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – साईट मार्जिनमधून काम आहे का?

मा. अलगुडे मुकारी – साईट मार्जिनमधून नाही, प्लॉटच्या मधूनच आहे.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – पाईपच्या वर बिल्डिंग येणार आहे का?

मा. अलगुडे मुकारी – त्यांनी ज्या ठिकाणाहून लाईन गेली आहे त्याच्या साईडनेच बांधकाम चालू केले आहे. पण लक्षात घ्या, उद्या जर काही दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण असणार आहे? किमान आम्ही पत्र दिल्यावर त्यांनी एस.आर.ए. बरोबर मिटिंग लावायला पाहिजे होती.

मा. महापालिका आयुक्त – मी एस.आर.ए. च्या लोकांना सूचना देतो,प्रत्यक्ष काम करणारे डेव्हलपरच असतील. एस.आर.ए. स्वत: काम करत नाही. त्यामुळे त्या डेव्हलपरबरोबर मिटिंग घेवून आपल्या पाईपला धोका न होता त्यांनी काम करावे लागेल आणि जर बिल्डिंगच्या खालून लाईन जात असेल तर ती शिफ्ट करावी लागेल आणि बाजूने जात असेल तर धोका न होता करावे अशा सूचना त्यांना द्या.

मा. पृथ्वीराज सुतार – तुम्ही तसे एस.आर.ए. ला सांगा की जर तुमची काही अंडरग्राउंड डेव्हलपमेंटची कामे असतील तर त्याबाबत आम्हांला महानगरपालिकेला माहिती द्या.

मा. अनिल राणे – माझा म्हात्रे पूलाच्या जवळच्या रस्त्याचा विषय होता त्याबद्दल काय झाले?

मा. महापालिका आयुक्त – आज मा. मुख्यमंत्र्यांकडे सुनावणी असल्यामुळे मा. वाघमारे तिकडे गेलेले आहेत त्यामुळे त्याबद्दलच्या माहितीसाठी आपण उद्या या विषयावर चर्चा करू. त्यांनी जे डिमार्केशन केलेले आहे ते प्रत्यक्ष जागेवर जावून केलेले आहे. त्यांच्या माहितीप्रमाणे असे दिसते आहे की, आपण जो रस्ता केला आहे तो डब्ल्यू.डी.पी. च्या येथून तो रस्ता केलेला आहे त्यामुळे हे करायचे असेल तर भूसंपादन करावे लागेल असे त्यांचे मत येत आहे. त्यामुळे त्याचा अभ्यासपूर्वक विचार करून मग आपण तो फायनल करू.

मा. अनिल राणे – पण त्याचे आपण अगोदर भूसंपादन केलेले आहे.

मा. महापालिका आयुक्त – भूसंपादन करून आपण जो टी.डी.आर. देवून जो रस्ता नकाशामध्ये दाखवलेला आहे त्याचे डिमार्केशन चुकलेले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. टी.डी.आर. जो दिला आहे तो झालेल्या रस्त्याचाच दिला आहे असे त्यांनी सांगितले.

मा. अनिल राणे – मा. आयुक्त साहेब या विषयामध्ये तुम्ही जरा डीपमध्ये लक्ष घाला. तसेच नंदन बिल्डरने जे गेट बंद केले आहे त्याची माहिती द्या. त्या ठिकाणी जे डिव्हाडर बोलाट आहेत ते ब्रीजच्या खाली घ्या.

मा. बोनाला, अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२) – नंदन बिल्डरच्या येथील जे गेट बंद केले आहे त्या ठिकाणी नदीपात्रातील रस्त्यावरून जड वाहने जाऊ नयेत म्हणून ट्रॅफिक पोलिसांनी कुलूप लावलेले आहे त्याबाबत मी डी.सी.पी.साहेबांशी स्वत: बोललो होतो. जे बोलाट्स आहेत ते खालच्या बाजूला घ्या असे मा. राणेसाहेबांचा प्रस्ताव आहे, त्याबाबत मी डी.सी.पी. साहेबांशी बोललो त्यावर त्यांनी मी स्वत: पाहतो आणि जे योग्य आहे त्याप्रमाणे लेखी कळवतो असे सांगितले आहे. ते आपल्याकडे येणार होते परंतू इलेक्शनमुळे ते येऊ शकले नाहीत. परंतू त्यांनी सांगितले आहे की योग्य आहे त्याप्रमाणे करू पण त्यावर १६ किंवा १७ तारखेनंतरच डिसीजन होईल.

मा. अध्यक्ष – आपल्याकडे ज्या अपंग कल्याणकारी योजना आहेत त्याची मुदत ३१ मार्चपर्यंत आहे. अपंगांचे म्हणणे आहे की, आम्हांला पास मिळालेले नाहीत.

मा. नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.)– आपण पास देण्यासंदर्भात आचारसंहिता विभाग प्रमुखांकडे विचारणा केली होती पण जुनी स्किम असली तरी आचारसंहितेत देता येणार नाही असे आचारसंहिता विभागाने कळविलेले आहे.

मा. अध्यक्ष – त्यांना नवीन पास मिळेपर्यंत जुन्या पासवर मुदतवाढीचा शिक्का मारून देण्यास सांगा.

मा. पृथ्वीराज सुतार – आचारसंहितेमध्ये नेमक्या कोणकोणत्या गोष्टी करायच्या नाहीत ते तरी सांगा. चेक देण्याबाबत आचारसंहिता हे ठीक आहे पण पास देण्यास काय हरकत आहे. आम्ही जर कोणत्या नवीन योजना करायच्या असतील तर त्यामध्ये अडचण येणे ठीक आहे पण ज्या महानगरपालिकेच्या जुन्या योजना असतील तर त्यासाठी अडचण यायला नाही पाहिजे.

मा. महापालिका आयुक्त – मी स्वत: त्यामध्ये लक्ष घातले आहे त्यामध्ये मी चर्चा देखील केलेली आहे, त्यामध्ये तसे स्पष्ट सांगितले की जरी जुन्या स्किम चालू असल्या तरी इलेक्शनकाळात त्या योजना राबविता येणार नाहीत. परंतू आपण त्या योजना लॅप्स होऊ देणार नाही आणि त्यांचे नुकसान होणार नाही अशी मी व्यवस्था केलेली आहे आणि तशी खबरदारीही घेतलेली आहे.

मा. अलगुडे मुकारी – वर्तमानपत्रामध्ये 'पालिकेने सोडले २ कोटीवर पाणी' असा लेख हंजर प्रकल्पाबाबत बातमी आलेली आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – त्यांच्याकडे आपण बँक गॅरंटी मागितली होती, ती घ्यायला पाहिजे होती ती आपण का घेतली नाही? त्यांची आर्थिक परिस्थिती काय आहे हे आपल्याला माहिती नाही तरीही आपण त्यांना पैसे देतो आहोत. बँक गॅरंटी याचा अर्थ काय आहे जर या कंपनीने आपले काही नुकसान केले तर ती एक प्रकारची सिक्युरीटी होते म्हणजे त्यांच्यावर आपले काहीतरी बंधन असावे. बँक गॅरंटी न घेता ५ वर्ष ते चालू आहे, ती गॅरंटी आपण घ्यायला पाहिजे होती, ती त्यांनी दिली नाही आणि तरीही आपण त्यांच्यावर एवढा खर्च करतो आहोत.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – मा. अध्यक्ष, हंजरचा हा जो प्रकल्प आहे तो प्रकल्प एकंदरीत आपल्याकडे असलेल्या कचराडेपोवर एन.बी.सी.सी., नवी दिल्लीच्या माध्यमातून अमलांत आलेला होता. त्याकरीता महानगरपालिकेने जागा द्यायची होती, त्यांना इनिशिअल जे पैसे द्यायचे होते ते एन.बी.सी.सी. च्या माध्यमातून द्यायचे होते आणि त्यासाठी सेल्को आणि हंजर अशा दोन एजन्सींना काम देण्यात आले होते. सेल्कोला ५०० टन आणि हंजरला २०० टनाचे काम देण्यात आले होते. त्यासाठी जागा महानगरपालिकेची असणार होती आणि त्यांना लागणारी काही रक्कम इनिशिअल काही कामांसाठी जी रक्कम लागणार होती ती एन.बी.सी.सी.च्या माध्यमातून उपलब्ध करून दिली होती त्यासाठी कालावधी/मर्यादा ३० वर्षांची होती. यामध्ये एन.बी.सी.सी. आणि हंजर व महानगरपालिका आणि हंजर असे ॲग्रीमेंट झालेली आहेत. यामध्ये हंजरने जी कार्यवाही करायची होती किंवा ज्या सक्षमतेने काम करणे गरजेचे होते त्या पध्दतीने ते करत नव्हते. हे पाहत असताना ॲग्रीमेंटमध्ये अशा काही गोष्टी निदर्शनास आल्या की, त्यांनी त्यामध्ये काही गोष्टी करणे क्रमप्राप्त होते त्यातील एक गोष्ट होती की, त्यामध्ये असे होते की त्यांचे जे डिपॉजीट होते ते महानगरपालिकेकडे त्यांनी जमा करायला पाहिजे होते, हे छाननी केल्यानंतर आपल्या डिपार्टमेंटच्या असे लक्षात आले की, त्यांनी आपल्याकडे जे २ कोटी रूपये डिपॉजीट/बँक गॅरंटी भरायचे होते ते त्यांनी भरलेले नाही. इलेक्ट्रिकच्या बिलाबाबत महानगरपालिकेने त्यांच्याबरोबर केलेल्या ॲग्रीमेंटमध्ये ५ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना ५५ रूपये टिपींग चार्जेस देणे आपल्या ॲग्रीमेंटमध्ये होते. ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यामध्ये त्यांचा पहिला प्लँट पूर्ण झाल्यानंतर आपण त्यांना तो टिपींग चार्जेस द्यायला सुरवात केली होती, त्याचा पहिला हप्ता आपण नोव्हेंबर महिन्यामध्ये दिला. पुढील काळात असे झाले, त्यांचे लाईटचे बिल थकले होते, त्या लाईट बिलाचे पैसे भरत असताना आपण डिसेंबरपासून मार्च महिन्यापर्यंत आपण जे टिपींग चार्जेस देऊ करू त्याच्या अगेंस्ट आपण लाईट बिल भरलेले होते. आपण दोन वेळा लाईट बिल भरलेले आहे आणि तिसऱ्या वेळी त्या कंपनीनेच लाईट बिल भरलेले आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – ॲग्रीमेंटमध्ये जसे म्हटले आहे त्याप्रमाणे काम झाले आहे का? ॲग्रीमेंटमध्ये ज्या अटी–शर्ती होत्या त्यांचे त्यांनी पालन केलेले आहे का? त्या ५ वर्षामध्ये त्यांनी प्रोजेक्टची कपॅसिटी वाढवायची होती, ती त्यांनी वाढवली आहे का? दुसरी गोष्ट त्यांनी बँक गॅरंटी भरायची होती ती त्यांनी दिली का? तुम्ही जे म्हणत आहात की ५ वर्षात आपण त्यांना डंपिंग चार्जेस वाढवून द्यायचे होते ते आपण देतो आहोत परंतू त्यांच्याकडून ज्या प्रोजेक्टची कपॅसिटी वाढवण्याबद्दल अपेक्षा होत्या त्या वाढल्या नाहीत. त्यांनी डिपॉजीट किंवा बँक गॅरंटी दिली नाही या गोष्टी कोणी पाहायच्या?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त(इ) – ५०० टन, २०० टन आणि ६०० टन अशा कपॅसिटी होती त्यांनी आता ३०० टन वाढवलेले आहेत.

मा. पृथ्वीराज सुतार – हे वाढलेले फक्त कागदावरच दिसते आहे, त्या ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर ४०० ते ५०० टनाच्या कचऱ्यावरही प्रोसेसिंग होत नाही. किती दिवस असे चालणार, आणि तरीही आपण त्यांना पैसे देतो आहोत. म्हणजे आपण आपले नुकसान करतो आहोत, ती कंपनी कॅपेबल नाही हे आपल्या लक्षात येते आहे तरीही आपण ती कंपनी पोसतो आहोत.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त(इ) – त्यांना जे देय केलेले आहे ते देयक आहे ते .. ..

मा. पृथ्वीराज सुतार – आपण त्याला पैसे दिल्यानंतर ते कसे ॲडजेस्ट करायचे ते आपण भाड्यात किंवा डंपिंगमध्ये ॲडजेस्ट करू शकतो आणि ते आपण करू, पण आपण त्यांना पोसतो आहोत. आपण त्याच्याकडून २ कोटी रूपये बँक गॅरंटी का घेतली नाही, ते का घेतले नाही, त्याचे काय करणार, ते कोण घेणार, त्याला जबाबदार कोण आहे? त्यांची कपॅसिटी वाढली नाही याला कोण जबाबदार आहे? त्यांना ज्यावेळी आपण पैसे देतो, मग त्यांच्या पैशाचे आपण काय करणार, ते आपण सोडून द्यायचे का?

मा. महापालिका आयुक्त – त्यांनी ती बँक गॅरंटी का घेतली नाही, ते मी पाहतो आणि आता जे आपण ॲडिशनल काम करायचे होते त्यासाठी त्यांनी ७५% बँक गॅरंटी आपल्याला द्यायची होती त्यासाठी आता आपण त्याला मुदत दिलेली आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – पहिलीच २ कोटीची बँक गॅरंटी दिलेली नाही, मी तर असे म्हणेन की ती पहिले २ कोटी रूपये त्यांच्याकडून व्याजासह घ्यायला पाहिजे, त्यामध्ये आपले ५ वर्षाचे किती व्याज बुडले.

मा. महापालिका आयुक्त – ती बँक गॅरंटी आहे, डिपॉजीट नाही.

मा. पृथ्वीराज सुतार – त्याच्याकडून आपल्याला मिळाल्यानंतर आपण डिपॉजीट ठेवल्यावर तर आपल्याला व्याज मिळाले असते. ते पैसे देत नाहीत तर आपण त्यांचा का विचार करतो आहोत. प्रत्येक वेळी आपण इश्यू व्हायला नको म्हणून आपणच ॲडजेस्ट करायचे का? असे किती वेळा करणार?

मा. अलगुडे मुकारी – बँक गॅरटी न घेता त्यांना कामे दिलेली आहेत असे चक्क पेपरला दिलेले आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – कचऱ्याचा प्रश्न आहे, शहरात रोगराई पसरायला नको हे आम्हांलाही मान्य आहे पण त्याचा प्रत्येक वेळी भावनिक दृष्टीने विचार केला तर ते त्याचाच आधार घेणार आहेत.

मा.महापालिका आयुक्त – आता परवा परत २५ लाखाचे जे बिल आले होते, ते आपण भरावे अशी त्याची इच्छा होती त्यावेळी मी स्ट्रीक्टली सांगितले की, आम्ही भरणार नाही. त्यांनी आता ५ लाख रूपये भरलेले आहेत, आणि मी देखील एम.एस.डी.एल. चे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत त्यांना मी विनंती केली, त्यावर त्यांनी आपल्याला १५ एप्रिलपर्यंत मुदत दिलेली आहे. आता मी त्यांना सांगितलेले आहे की जोपर्यंत तुम्ही बँक गॅरंटी देत नाही तोपर्यंत सध्या आम्ही कोणतेही पैसे भरणार नाही.

मा. पृथ्वीराज सुतार – आता त्यांनी बँक गॅरंटी दिल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे पैसे त्यांना देऊ नका.

मा. महापालिका आयुक्त – म्हणूनच आपण त्यांना पेमेंट दिलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतू आता ते बंद पडले असते, दोन दिवस ते बंद होते कारण लाईटच गेलेले होते. शेवटी मी त्यांच्या वरिष्ठांशी दिवसातून ४ वेळा बोललो, आपण त्यांना अंडरटेकींग दिले की, १५ तारखेपर्यंत भरण्याची तो व्यवस्था करील कारण त्याने सांगितले होते की ३१ मार्चपर्यंत मिळणार नाही पण एप्रिल महिन्यामध्ये मी देतो, म्हणून आपण १५ एप्रिलपर्यंत भरील या अटीवर त्यानेच भरलेल्या ५ लाखांवर लाईट जोडून दिली. आता आपण तिसऱ्या बिलाच्या वेळी पैसे भरलेले नाहीत. पण हा विषय तुम्ही म्हणता तो खरा आहे की, १५ तारीख जवळ आल्यानंतर पुन्हा तो तसाच चालू राहणार.

मा. पृथ्वीराज सुतार – तो तसेच करेन, म्हणून आपणही कुठेतरी कडक धोरण स्विकारायला पाहिजे.

मा. महापालिका आयुक्त – आपण त्याला स्वतंत्र वकील नेमून सगळे जे काही लॅकून आहेत ते काढण्यासाठी आणि हिशोब करण्यासाठी नेमलेला आहे. त्याला शो–कॉज नोटीससाठी एक स्वतंत्र सेल तयार केलेला आहे. ते मी ऑलरेडी करतो आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – आपण लिगली प्रोसिजर करतो आहे पण हे कुठेतरी थांबले पाहिजे, हा देखील विचार करा. दर दोन दिवसांनी त्यावर काहीतरी चर्चा होतच असते. मा. अध्यक्ष आमची विनंती आहे की, त्यामध्ये त्याने बँक गॅरंटी दिल्याशिवाय त्याला कुठलेही पेमेंट इश्यू करू नये. त्याने जर अटी–शर्तींचा भंग केला असेल तर कायदेशीरच कारवाई करायला पाहिजे.

मा. अध्यक्ष – मा. आयुक्तांनी तेवढयासाठीच सांगितलेले आहे की, त्याला कायदेशीर बाबींचा आधार घेवूनच पुढील कारवाई करण्याचे त्यांनी ठरविलेले आहे. त्याचे जे लॅकून आहेत ते हायलाईट करून त्याला समज देणे हे सर्वात महत्वाचे आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – त्याचे पेमेंट थांबवा.

मा. अध्यक्ष – त्याशिवाय ते पेमेंट देतच नाहीत.

मा. महापालिका आयुक्त – जनरल बॉडीमध्ये जे ठरले होते, ऊर्जितावस्थेत काही दिवस आणण्यासाठी आपण जे एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट काढले की जे काही नवीन प्रोजेक्ट वेगवेगळया भागात करायचे आहेत आणि जर हे पूर्ण बंद पडले तर गावकरी कचरा घेत नाहीत, प्रोसेसिंग झाले तरच घेतात. म्हणून याला नवीन पर्यायी व्यवस्था होईपर्यंत आपण त्याला बँक गॅरंटीच्या आधारावर आणि ५०% तो जे मटेरीयल प्रोडयूस करतो त्यावर आणि ५०% रक्कम आपल्याकडे जमा करण्याच्या आधारावर त्याला आपण मदत करायची आहे. ती मदत करण्यासाठी त्याने आपल्याला जी ७५% गॅरंटी द्यायला पाहिजे, त्याबाबत आपण त्याच्या मजूरांचा पगार, इलेक्ट्रिसिटी बिल आणि १० लाख रूपये मेंटेनन्स चार्जेस ही आपण ५५ रूपये जी टिपींग फी देतो त्याऐवजी ३०० रूपये टिपींग फी ग्राह्य धरून जी दुसऱ्या प्रकल्पांना दिली त्याच्या अंतर्गत बँक गॅरंटी घेवून आणि त्याच्या विक्रीच्या ५०% रक्कम आपल्याकडे डिपॉजीट करून त्याच्या आधारावर आपण त्याला पुढील काळात मदत करायची आहे कारण जोपर्यंत पर्यायी प्रपोजल आपल्यासमोर फायनल होत नाही तोपर्यंत हे बंद पडले तर आपल्यासमोर कचऱ्याचा प्रश्न निर्माण होईल म्हणून आपण साधकबाधक चर्चा करून हा निर्णय घेतला. नवीन सुधारीत ॲग्रीमेंट जे आपण करतो आहोत ते तयार केलेले आहे, त्यावर त्याने सहीदेखील केलेली आहे, एक–दोन मुद्दयांवर त्याची हरकत होती, येत्या दोन दिवसात तो मा. जगताप यांच्याकडे येवून तो फायनल करणार आहे. आपण आता स्पष्ट धोरण घेतलेले आहे की, बँक गॅरंटी दिल्याशिवाय आम्ही तुम्हांला इलेक्ट्रिक बिल वगैरे काहीही देणार नाही.

मा. पृथ्वीराज सुतार – डंपींग चार्जेसचा विषय ५५ रूपयांचा ३०० रूपयांना तो आपण कुठे मंजूर केला आहे?

मा. महापालिका आयुक्त – ५५ रूपयांच्या ऐवजी ३०० रूपये टिपींग फीच्या अंतर्गत आपण बँक गॅरंटी घेवून आपण त्याला मदत करायची होती.

मा. पृथ्वीराज सुतार – त्याने अगोदरचीही बँक गॅरंटी द्यायला पाहिजे आणि आताची वाढीवही द्यायला पाहिजे.

मा. महापालिका आयुक्त – त्याने ५ लाख मी भरतो, बाकी तुम्ही भरा असे त्याचे म्हणणे होते. शेवटी आपण लाईट कट होण्याअगोदर वाट पाहिली. चार–पाच दिवस आपण चीफ इंजिनिअरशी बोलून ते कट होऊ दिले नाही, तरीदेखील त्याने पैसे भरले नाहीत, शेवटी दोन दिवस लाईट कट झाल्यानंतर त्याने ५ लाख रूपये भरले, ते भरल्यानंतर त्याची अपेक्षा होती की, उरलेले आपण भरावेत पण आपण भरले नाहीत. मी स्ट्राँगली लावून धरले त्यानंतर एम.डी. यांच्याशी बोललो, की आम्हांला निदान १५ दिवस तरी मुदत द्या. त्यांनी मुदतवाढ दिली आणि मुंबईवरून फोन आल्यानंतर आपली लाईट चालू झाली. पण आपण तिसऱ्या वेळी एकही पैसा भरलेला नाही.

मा. अलगुडे मुकारी – त्या कंपन्यांना माहिती आहे की, महापालिका पैसे देते, कारण त्यांना माहिती आहे की महापालिकेला गरज आहे. आता हे दोन कोटीचे नुकसान झाले त्याची जबाबदारी कोणाची आहे?

मा. महापालिका आयुक्त – मा. अध्यक्ष, आता जर ते बंद झाले तर पूर्ण कचरा प्रोसेसिंग बंद होते, त्यात पुढे काही प्रश्न आहेत.

मा. अध्यक्ष – आपण यावर अजून काही पर्याय म्हणून रोकेमचा जो प्रकल्प आहे त्याची क्षमता वाढवून आपण काही धोरण ठरवून त्यावर आपण लक्ष केंद्रीत केले आहे का?

मा. महापालिका आयुक्त – मा. अध्यक्ष, कालच मी रोकेम, दिशा अशा दोन्ही प्रकल्पांच्या येथे जाऊन आलो तसेच मागील आठवडयात अजिंक्यला जाऊन आलो, तो जवळपास महिन्याभरापासून आपल्या गाडया फोडल्यामुळे बंद होता, त्याबाबत मी पोलिसांशी बोललो आणि आता तो ४–५ दिवसांपासून पुन्हा सुरू झालेला आहे. त्यानंतर आता रोकेमला मी जाऊन आलो त्या ठिकाणीही त्यांनी आता नवीन मशिनरी बसविलेली आहे. डिझेलवर जे चालत होते त्याची जी लाईट सध्या चालू होईल त्याच्याच आधारावर त्याने ती तिथेच युटीलाईज करून प्रोजेक्ट चालवावा, ८ दिवसात ती मशिनरी फिटींग पूर्ण होईल. आता एम.ए.आर.सी. कडे ४ रूपये ८८ पैसे प्रति युनिटचा जो प्रस्ताव गेलेला आहे त्याचा आता दोन–तीन तारखा झाल्या, आपण स्वत: त्यांच्या संपर्कात आहोत. त्याची १९ तारीख दिलेली आहे ती झाल्यानंतर इलेक्ट्रिसिटी आर.डी.एफ.च्या आधारावर आता कनेक्शन झाल्यावर तो टप्प्याटप्प्याने वाढवणार आहोत. आता तो २०० मॅट्रिक टनावर तो प्रोसेस करतो आहे आणि दिशा १०० मॅट्रिक टनावर असताना आपण त्याला १५० टन वगैरे देतो आहोत. आता आपला प्रयत्न आहे की, त्यांनी ते फुल कपॅसिटीने चालविले पाहिजेत आणि आपण नवीन प्रक्रियेसाठी जे एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट केले होते त्याची अंतिम मुदत ४ एप्रिल आहे. ४ एप्रिलला किती लोकांचे आले त्या आधारावर स्टॅंडिंग कमिटी किंवा सर्व गटनेते यांना आपण ते दाखवून त्यामध्ये आपल्याला जे चांगले वाटेल त्याचे आपण प्रोसेसिंगचे युनिट पुढे घेऊ, परंतू तोपर्यंत अल्टरनेटीव हे तिन्ही प्रकल्प फुल कपॅसिटीत चालणे आणि आपण जे अल्टरनेटीव प्रपोजल जे केले आहेत ते ॲक्सेप्ट करणे हे होईपर्यंत हंजर जे आजारी आहे त्याला आपले सध्या बळजबरी ढकलण्याशिवाय आपल्याकडे पर्याय नाही.

मा. अध्यक्ष – रोकेमची फुल कपॅसिटी कितीची आहे?

मा. महापालिका आयुक्त – ७०० पर्यंत आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – आपण त्याची बॅंक गॅरंटी घेतली नाही त्या संदर्भात विषय चालू होता.

मा. जगताप, उपायुक्त (वि.का.४) – आपण बॅंक गॅरंटी संदर्भात मागे मा. यादव साहेब असताना तीन वेळा पत्र दिली होती.

मा. पृथ्वीराज सुतार – पत्राबाबत नाही, ॲग्रीमेंटमध्ये बॅंक गॅरंटी संदर्भात माहिती होती तर त्यावेळी ती का घेतली नाही?

मा. जगताप, उपायुक्त (वि.का.४) – मा. यादव साहेब असताना तीन वेळा पत्र दिली होती आणि आता कालही आम्ही त्यांना एक पत्र पाठविले आहे की, बॅंक गॅरंटी द्या त्याशिवाय आम्ही पुढील...

मा. पृथ्वीराज सुतार – ॲग्रीमेंट झालेले किती साली झाले?

मा. जगताप, उपायुक्त (वि.का.४) – २००८ साली झाले आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – आता ६ वर्षे झाले, आपल्याला इतक्या वर्षात त्यांच्याकडून २ कोटीची बॅंक गॅरंटी घ्यायला जमले नाही का? आपण त्यांना पोसतो आहोत, त्यांच्याकडे काहीच नाही. लाईट बिल आपणच भरायचे, शहरामध्ये अडचणी निर्माण व्हायला नको म्हणून आपणच सगळे करतो आहे, ही पध्दत नाही. तिथे आपण जेवढा पैसा खर्च करतो आहे तो सर्व वाया जातो आहे. त्या ठिकाणी आपल्याही प्रॉपर्टीचे नुकसान होते, काही प्रॉब्लेम झाला की, प्लॅंट बंद करा, रस्ते बंद करा, गाड्या फोडा, हे नुकसानही आपलेच आहे. यावर काहीतरी ठोस निर्णय घ्यायला पाहिजे. त्यांनी २ कोटी रूपये भरणे अपेक्षित होते, जर बॅंक गॅरंटी घेतली तर या २ कोटीमधून आपण हे खर्च भागवले असते. बॅंक गॅरंटी कशासाठी घ्यायची भविष्यात याने काही नुकसान केले तर त्या बदल्यात आपण ते पैसे वापरू शकतो.

मा. जगताप, उपायुक्त (वि.का.४) – आता आपण त्यांना बॅंक गॅरंटी घेतल्याशिवाय पुढील कुठलेही पेमेंट करणार नाही असे त्यांना निक्षून सांगितलेले आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – आता तुम्ही त्यांच्याकडून किती बॅंक गॅरंटी घेणार आहात?

मा. जगताप, उपायुक्त (वि.का.४) – मागील २ कोटीची बॅंक गॅरंटी आणि आता जनरल बॉडीने जो ठराव मंजूर केला आहे की, लाईट बिल आणि तेथील मजूरांचा पगार करायचा आहे त्या अनुशंगाने जे आपण पेमेंट करतो तेवढया रकमेची बॅंक गॅरंटी घेणार आहोत.

मा. पृथ्वीराज सुतार – २ कोटी रूपये बॅंक गॅरंटी घ्यायची हे कोणी ठरविले?

मा. जगताप, उपायुक्त (वि.का.४) – पूर्वीच्या ॲग्रीमेंटमध्ये ठरल्याप्रमाणे...

मा. पृथ्वीराज सुतार – ॲग्रीमेंट आपणच बनविले आहे, मग आता त्याची बॅंक गॅरंटी वाढवून घ्या. ७५% ॲडिशनल घेत आहात तर ती २ कोटी देखील वाढवून घ्या. कारण आता त्या ॲग्रीमेंटला १० वर्षे उलटून गेली आहेत. त्यामुळे आता येथून पुढे बॅंक गॅरंटी घेतल्याशिवाय कुठलेही पेमेंट करू नका.

**– वृत्तांत कायम करणे –**

मा. स्थायी समिती सभा क्र. ५० दि. १७/१२/२०१३, मा. स्थायी समिती सभा क्र. ५१ दि. १८/१२/२०१३, मा. स्थायी समिती सभा क्र. ५२ दि. १९/१२/२०१३ व मा. स्थायी समिती सभा क्र. ७२ दि. १८/०२/२०१४ रोजीचे एकूण ४ वृत्तांत कायम करण्यात आले.

**कार्यपत्रिकेवरील विषय**

विषय क्र. – १

निर्णय – मा. सह महा. आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.

विषय क्र. – २

मा. अध्यक्ष – माहिती द्या.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त (घोले रोड) – मा. अध्यक्ष, एस.सी.एम.टी.आर. साठी आपण भूसंपादन सुरू केलेले आहे आणि आपल्या जागा ताब्यात घेण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे सादर केलेले आहेत. साधारण ३५ किलोमीटरचा प्रस्ताव आपण शासनाकडे पाठविलेला आहे. त्यामध्ये साधारण खराडी भाग वगळता बाकी संपूर्ण एस.सी.एम.टी.आर. ची संपादनाची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

मा. पृथ्वीराज सुतार– या पूर्ण रस्त्याचा सर्वे झालेला आहे का?

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त (घोले रोड) – यामध्ये प्रायमरी मोनार्च या संस्थेमार्फत सर्वे केलेला आहे, त्या अनुशंगाने प्रस्ताव आपण तयार केलेले आहेत.

मा. पृथ्वीराज सुतार – प्रस्ताव केल्यानंतर जागेवर याबाबत काय परिस्थिती आहे?

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त (घोले रोड) – जागेवर जॉईंट मेजरमेंटचे प्रलंबित आहे फक्त मुंढवा भागातील मेजरमेंट भूसंपादनाच्या अनुशंगाने झालेले आहे. काही ठिकाणी जमीनी मोकळयाही आहेत आणि काही ठिकाणी अतिक्रमणेही झालेली आहेत.

मा. पृथ्वीराज सुतार – यामध्ये दोन गोष्टी आहेत, काही ठिकाणी व्हेकंट लॅन्ड आहे, काही ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत, काही ठिकाणी सँक्शन बिल्डिंग झाल्या आहेत, काही ठिकाणी ओढयांमधून तो रस्ता आहे.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त (घोले रोड) – हो आहे, नाल्यामधूनही रस्ता आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – मग आपण तो कसा काय करणार आहोत?

मा. हेमंत रासने – मा. अध्यक्ष, अतिक्रमणे झाली असतील तर ते अनधिकृत आहेत पण अधिकृत एस.सी.एम.टी.आर. चे रिझर्वेशन असताना सँक्शन प्लॅन किती झाले त्याची संख्या सांगा.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त (घोले रोड) – बांधकाम विभाग माहिती सांगेन.

मा. पृथ्वीराज सुतार – नाही, बांधकाम विभाग का, ते तुमचे रस्त्याचे डिपार्टमेंट असेल तर त्याची माहिती तुम्हांला असायला पाहिजे.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त (घोले रोड) – सँक्शनबाबत बांधकाम विभागच माहिती सांगू शकेल.

मा. पृथ्वीराज सुतार – तुम्ही त्यासाठी जॉईंट सर्वे केला असेलच, मग त्यामध्ये तुम्हांला किती जागा अतिक्रमणमध्ये तसेच किती जागा इतर कारणांसाठी गेली आहे ते सांगता आले पाहिजे.

मा. अनिल राणे – तुमच्या खात्याने बांधकाम खात्याचा अभिप्राय घेतला असेलच ना.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त (घोले रोड) – माहिती संकलित करून पुढच्या मिटिंगला देतो.

मा. हेमंत रासने – एस.सी.एम.टी.आर. चे रिझर्वेशन असतानासुध्दा आपण जे प्लॅन सँक्शन केले त्याची संख्या द्या. आपण खात्याचा अभिप्राय घेतला आहे किंवा नाही?

मा. अनिल राणे – किती क्षेत्र बांधकामामध्ये गेलेले आहे?

मा. पृथ्वीराज सुतार – जर समजा सर्व जागा ताब्यात आल्या तर त्या जागेवर रस्ता होणे शक्य आहे का? त्याचीही माहिती द्या. तो किती फुटी रस्ता आहे?

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त (घोले रोड) – पुढील मिटिंगला माहिती देतो. आपण त्याचे प्रेझेंटेशनही केलेले आहे, ते देखील पुढील मिटिंगला दाखवतो.

मा. हेमंत रासने – रिझर्वेशन असताना अधिकृत सँक्शन किती झाले याची संख्या द्या आणि ते कसे झाले? याबाबतचा खुलासा द्या.

मा. महापालिका आयुक्त – ॲडिशनल कमिशनर मा. बकोरिया साहेब या आठवडयात मिटिंग घेतील. त्यावेळी सर्व संबंधित लोकांना, बांधकाम विभागातील लोकांना आणि जो काही मेजरमेंट झालेले आहे त्याबाबतची माहिती आणि त्या ठिकाणी एस.सी.एम.टी.आर. चे रिझर्वेशन असतानासुध्दा बांधकामे झाली आहेत का? आणि तशा त्या ठिकाणी परवानग्या दिल्या आहेत का? याबाबत सविस्तर आढावा घ्या आणि त्याबाबतची माहिती पुढील मिटिंगला द्या.

निर्णय – सदर विषयाचा विचार १५ दिवसानंतर करावा.

विषय क्र. – ३

मा. अध्यक्ष – याबाबत काय माहिती देता येईल?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त(इ) – आता अस्तित्वात असलेले जे नाले आहेत, त्या नाल्याला पॅरल्ल लाईन घरापासून ते एस.टी.पी. पर्यंत करावी लागेल आणि त्याचे विभाजन करण्याकरीता एकंदरीत खर्च किती येणार आहे, त्याचे फायदे–तोटे काय आहेत ते सांगतील.

मा. पृथ्वीराज सुतार – म्हणजे आपण जशी ड्रेनेज लाईन टाकतो त्याप्रमाणे ही वेगळी लाईन टाकायची आहे का?

मा. कुलकर्णी, अधीक्षक अभियंता (ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प) – मा. अध्यक्ष, घरामध्ये जे मैलापाणी तयार होते त्यामध्ये दोन प्रकार आहेत, एक किचन आणि बाथरूममधून येणारा आणि दुसरे टॉयलेटमधून येणारा. टॉयलेट आणि किचनमधून येणारे पाणी सेपरेट करून त्यासाठी सेपरेट टेरेस चीप तयार करावी लागणार आहे. त्याची जी सिस्टीम आहे ती म्हणजे अगोदर एकाच पाईपमधून जे काम होत होते ते आता सेपरेट लाईन टाकून करावे लागणार आहे. शहरामध्ये पॅरल्ल सिस्टीम एक पाण्याची लाईन, ड्रेनेज लाईन तिसरी ग्रे वॉटरची लाईन हे डेव्हलप करावे लागणार त्यानंतर सर्व्हिस केबल वगैरे ही फार मोठी खर्चीक गोष्ट आहे आपल्याला इंम्प्लीमेंट करणे अडचणीचे होणार आहे.

मा. अध्यक्ष – आता जी माहिती तुम्ही दिली त्याबाबतचा अभिप्राय द्या.

निर्णय – सदर प्रस्तावावर मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

विषय क्र. – ४

मा. पृथ्वीराज सुतार – या विषयाची आम्ही माहिती मागितली होती ती आम्हांला अर्धवट मिळाली आहे.

मा. शिंदे, उपायुक्त (भू.जि.) – आम्ही मा. सभासदांनी जी माहिती मागितली होती ती सर्व दिलेली आहे, परंतू ते म्हणत आहेत की माहिती अर्धवट मिळाली आहे तर आम्ही पुन्हा त्यांना माहिती देतो. त्यांना जी माहिती दिली आहे त्यापेक्षा वाढीव माहिती त्यांना हवी आहे ती देखील माहिती आम्ही त्यांना देतो. पुढील मिटिंगला माहिती देतो.

निर्णय – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र. – ५

निर्णय – मा. सह महा. आयुक्त (विभागीय कार्यालय क्र. ४) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.

विषय क्र. – ६

निर्णय – मा. सह महा. आयुक्त (विभागीय कार्यालय क्र. ४) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.

विषय क्र. – ७

निर्णय – मा. उप आयुक्त (विभागीय कार्यालय क्र. ३) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.

विषय क्र. – ८

निर्णय – सदरचा विषय मा.ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात येत आहे.

विषय क्र. – ९

निर्णय – सदरचा विषय मा.ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात येत आहे.

विषय क्र. – १०

निर्णय – सदरचा विषय मा.ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात येत आहे.

विषय क्र. – ११

निर्णय – सदरचा विषय मा.ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात येत आहे.

विषय क्र. – १२

निर्णय – सदरचा विषय मा.ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात येत आहे.

विषय क्र. – १३

निर्णय – मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.

विषय क्र. – १४

निर्णय – मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.

विषय क्र. – १५

निर्णय – मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.

विषय क्र. – १६

मा. अनिल राणे – त्या ठिकाणी चौकात ट्रॅफिक जॅम होते आहे म्हणून त्यांना त्या ठिकाणी रस्त्याचे रूंदीकरण करून पाहिजे. अभिप्राय वाचून दाखवा.

मा. नगरसचिव – हा अभिप्राय मा. स्थायी समिती ठराव क्र. ८६५ दि. ३/०९/२०१३ अनुसरून आलेला आहे. तत्पूर्वी देखील या विषयाचा अभिप्राय १८/०२/२०१४ ला आला होता त्यावेळी मा. स्थायी समितीने फेर अभिप्राय द्यावा असा निर्णय केला आणि पहिला जो फेर अभिप्राय एल.इ.ओ. कडून आला आहे आणि हा भूमीप्रापनकडून आला आहे. दोन्ही अभिप्राय वाचून दाखवतो. जे फेर अभिप्रायाला गेला तो पहिला अभिप्रायही वाचून दाखवतो.

'संदर्भांकीत ठरावाच्या अनुशंगाने रस्ता आखून नेणेकामी बांधकाम विभागाकडे भूमी–जिंदगी विभागाकडून पत्रव्यवहार केला असता बांधकाम विकास विभागाने दि. २३/०१/२०१४ चे पत्रानुसार १३ चा प्रारूप विकास आराखडा मंजूर झाल्यानंतर आखून देण्यात येतील असे कळविले आहे, त्यानुसार आर.टी.ए. चौक ते शाहीर अमर शेख चौक, जुना बाजार चौक हा नियोजीत २० मीटर रूंदीचा रस्ता हा पुणे महानगरपालिका सुधारीत विकास योजना सन २०१३ च्या आराखडयामध्ये जुन्या हद्दीसाठीचा दर्शविलेला आहे. सदर प्रारूप विकास योजना आराखडा महाराष्ट्र शासनाने मंजूर

केल्यानंतर वाढीव रस्ता रूंदी क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात देणेकामी संबंधित शासकीय कार्यालयाकडे पत्रव्यवहार करण्यात येईल.' असा पहिला अभिप्राय होता त्यावर फेरअभिप्राय द्यावा असा निर्णय झालेला आहे. तो फेर अभिप्राय अजून आलेला नाही. आणि आता जो अभिप्राय आलेला आहे तो भूमीप्रापन विभागाकडून आलेला आहे, तो वाचून दाखवतो.

'विषयांकीत बाबत संदर्भाकींत ठरावान्वये आर.टी.ए. चौक ते शाहीर अमर शेख चौक दरम्यानचा रस्ता कलम २१० (१)(ब)अन्वये रूंद करण्यास तसेच रस्तारूंदी जागेचे ताबे अर्जन्सीखाली घेणेबाबत कळविले आहे, मात्र सदर ठिकाणी रस्ता कोणत्या बाजूने किती रूंद करणे याचा बोध होत नाही. सद्यस्थितीत जागेवर अस्तित्वात असणारा रस्ता १३ मीटर रूंद आहे, तसेच दोन्ही चौकात तो किमान ३० मीटर रूंद आहे. पुणे शहराच्या जुन्या हद्दीसाठी १३ मध्ये प्रसिध्द केलेल्या प्रारूप विकास आराखडयामध्ये २० मीटर रूंदीचा रस्ता प्रस्तावित केलेला आहे त्यामुळे नव्याने कलम २१० (१)(ब) नुसार रस्ता रूंदी करण्याची आवश्यकता नाही.'

मा. अनिल राणे – विकास आराखडयामध्ये आहे असे तुम्ही म्हणत आहात पण तो कधी मंजूर होणार आहे?

मा. महापालिका आयुक्त – जुना विकास आराखडा, प्रारूप प्रसिध्द झाला, कमिटी नेमली त्याची सुनावणी होऊन आता फायनल होईल.

मा. अनिल राणे – विकास आराखडयामध्ये असेल तर त्यावेळी आपण काय प्रोसेस करणार आहे? भूमी संपादन करणारच आहे.

मा. महापालिका आयुक्त – आपल्याला टी.डी.आर. देवून घ्यावे लागतील.

मा. अनिल राणे – तीच प्रोसेस करणार आहे तर ती आता केली तर काय फरक पडणार आहे?

मा. माधव जगताप, सहा. आयुक्त, घोले रोड – नवीन विकास आराखडयामध्ये तो रस्ता आखणी केलेला आहे त्यामुळे २१० (१) प्रमाणे आखू नये असे आपण प्रस्तावित केले आहे.

मा. महापालिका आयुक्त – कारण आराखडयात आता ऑलरेडी धरलेला आहे.

मा. अनिल राणे – आराखडा आता किती दिवसांपासून चालला आहे. त्या चौकात गरज आहे, जर त्या ठिकाणी वाहतूक कोंडी होत असेल तर अर्जन्सी क्लॉजखाली करायला काय अडचण आहे?

मा. महापालिका आयुक्त – प्रस्तावित असताना मला वाटते करता येणार नाही.

मा. खरवडकर, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ ) – यामध्ये प्रस्तावित आहे, आणि प्रस्तावित रोड करायचा असेल तर आपल्याला कॉम्पेनसेशन द्यावे लागेल, ते कॉम्पेनसेशन देण्याची तरतूद नाही कारण डी.पी. मध्ये प्रस्तावित असल्यामुळे आपल्याला डी.पी.मान्य झाल्याशिवाय देता येणार नाही आणि २१० खाली करायला गेले तर आपल्याला टी.डी.आर. देता येणार नाही, कारण तो प्रस्तावित डी.पी.मध्ये आहे. आपण तो २१० आखला असे जरी आपण समजले तरी त्याचे ॲक्विझिशन शक्य नाही आणि त्याचे कॉम्पेनसेशन आपल्याला नियमाप्रमाणे देता येणार नाही. तो डी.पी.मध्ये प्रस्तावित केलेला असल्यामुळे डी.पी. लवकरात लवकर करणे हाच त्याला पर्याय आहे.

**निर्णय – सदर विषयाचा विचार १५ दिवसानंतर करावा.**

विषय क्र. – १७

मा. मुकारी अलगुडे – मान्य करा.

मा. पृथ्वीराज सुतार – कुठले करारनामे आहेत?

मा. जगताप, अति.महा. आयुक्त (इ) – वेगवेगळ्या ठिकाणी आपण जे स्टॉल देतो, त्या स्टॉलधारकांबरोबर जे करारनामे करायला लागतात ते महानगरपालिकेतर्फे ते अधिकार खातेप्रमुखांना आहेत.

मा. पृथ्वीराज सुतार – पूर्वी कोण करत होते?

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – पूर्वी हॉकर्स पॉलिसीच्या अनुशंगाने मा. महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने ते मा. उपायुक्त (वि) यांच्याकडे ते अधिकार देण्यात आलेले होते. परंतू मध्यंतरी आपण मा. विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेतला त्यानुसार मा. स्थायी समितीच्या निदर्शनास ही बाब आणून हे अधिकार द्यावेत असे अभिप्राय आल्यानुसार आपण तो मा. स्थायी समितीसमोर ठेवला आहे. पुणे शहरामध्ये हॉकर्स पॉलिसीच्या अनुशंगाने पुणे स्टेशनला किंवा इतरत्र जे गाळे बांधलेले आहेत ते आपण करारनामे करून हे गाळे देत आहोत. त्या अनुशंगाने हे सर्व करारनामे ३० एप्रिलला संपत आहेत त्यामुळे ते १ मे पूर्वी करणे आवश्यक आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – इलेक्शनच्या काळात करार करणार का?

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – मा. विधी सल्लागारांचा अभिप्राय घेवून आम्ही ते करतो.

मा. पृथ्वीराज सुतार – काही रिन्यू करणार असेल तर तुम्ही करू शकत नाही मग हे कसे काय करणार आहात?

मा. महापालिका आयुक्त – आज आपण त्यांना अधिकार देऊ आणि आचारसंहितेनंतर त्यावर कार्यवाही करता येईल.

मा. पृथ्वीराज सुतार– आता तुमचे पथारीवाल्यांचे लायसेन्ससंदर्भात सर्वे चालू आहेत, ते किती दिवस चालणार आहेत?

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – साधारण १५ ते २० दिवस लागतील. ५० ते ६० % सर्वे झालेला आहे आणि त्यासाठी आपण प्रोग्रामही ठरविलेला आहे. आठवडयातून तीन दिवस एका झोनमध्ये असे ते काम चालू आहे. हॉकर्स पॉलिसीमध्ये शहराच्या मध्यवस्तीत जवळपास ३०% लोक आहेत, आणि बाकी ठिकाणी कमी प्रमाणात आहेत.

विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाला आपण ४ टॅब दिलेले आहेत म्हणजे जवळपास ५०० सर्वेक्षण रोज केली जातील असे आपण प्लॅनिंग केलेले आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – आमच्या भागातील स्टॉलवर २ ते ३ महिन्यापूर्वी कारवाई केलेली आहे त्यांचे अजून पुनर्वसन केलेले नाही.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – मयूर कॉलनीतील स्टॉल्स आपण काढले होते आणि त्यामधील काही स्टॉलधारकांनी कोर्टामध्ये याचिका दाखल केली आहे. त्या लोकांचा पुनर्वसन करावे म्हणून मयूर कॉलनीलगतच एक जागा आहे त्या जागेचा इश्यू आपण भूमी जिंदगी खात्याकडे अभिप्रायासाठी दिलेला आहे. त्याचप्रमाणे कोथरूड क्षेत्रीय कार्यालयाला त्यानुसार आखणी करून पुनर्वसन करावे अशा सूचना दिलेल्या आहेत. त्याची प्रोसेस सुरू आहे आणि त्याचे प्लॅनिंग आमच्याकडे सादर करावे आणि मान्यतेनंतर आचारसंहितेनंतर करावे.

मा. पृथ्वीराज सुतार – मा. अध्यक्ष, हे चूकीचे आहे, आम्ही त्यांना परत त्या ठिकाणी स्टॉल ठेवायला लावू. आम्ही त्यांची मानसिकता बदलून ते स्वत:हून तयार झाले, म्हणजे त्यांचे चुकले का? त्यांचे पुनर्वसन करण्याची आपली जबाबदारी नाही का? ते लोक ३ महिन्यांपासून उपाशी आहेत त्याला जबाबदार कोण आहे?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – पुनर्वसन करताना त्या अटी–शर्ती पूर्ण करून त्यांना द्या.

मा. पृथ्वीराज सुतार – अगोदर ते जागेवर ठेवा आणि नंतर अटी–शर्ती पूर्ण करा. अगोदर तुम्ही का तसे सांगितले आणि मग आम्ही लोकांना का फेस करायचे?

मा. रविंद्र धंगेकर – मा. अध्यक्ष, मा. सुतार बोलत आहेत ते बरोबर आहे. आम्ही एखाद्या स्टॉलधारकाला सांगितलेले असते की स्टॉल हलवा, त्यासाठी काय प्रोसिजर आहे ती आम्हांला समजून सांगा.

मा. पृथ्वीराज सुतार – आपली कॉर्पोरेशनची ओपन मार्केटची रिझर्व जागा आहे त्या ठिकाणी ठेवायला जागा दिली.

मा. सौ. मोनिका मोहोळ – त्या ठिकाणी का ठेवले गेले नाही?

मा. अनिल राणे – त्यांचे लवकर पुनर्वसन करा.

मा. पृथ्वीराज सुतार – का दिले नाही, ते इमिजिएट व्हायला पाहिजे होते. त्या लोकांनी कॉर्पोरेशनच्या लोकांना सहकार्य केले.

मा. रविंद्र धंगेकर – आपण जेव्हा स्टॉल काढतो त्यावेळी त्याला पर्यायी जागा देण्याची आपल्याकडे पध्दत आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – त्यांच्याकडे लक्ष द्यायला कोणाला वेळ नाही, एकदा तुमचे काम झाले की त्या ठिकाणी कोणाला जायला आणि यायला वेळ नसतो.

मा. सौ. मोनिका मोहोळ – काही स्टॉल तसेच ठेवतात आणि काही काढतात.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – मे. सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार आपण टाऊन वेंडींग कमिटी शहरासाठी स्थापन केलेली आहे, त्याबरोबरच एक प्रभागफेरी कमिटीही स्थापन केली आहे.

मा. रविंद्र धंगेकर – तुम्ही उचललेले स्टॉल कुठे ठेवणार आहात?

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – नियमानुसारच आपल्याला स्टॉल कुठेही ठेवता येणार नाही, आता कुठलाही स्टॉल राहणार नाही, स्टॉलचे रूपांतर आता पथारीमध्ये होणार आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – त्यासाठी अजून वेळ असेल तर आम्ही त्या लोकांना त्याच ठिकाणी स्टॉल ठेवायला सांगतो.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – १ ते १.५ महिन्यामध्ये फायनल होईल.

मा. रविंद्र धंगेकर – जो निर्णय होईल तो होईल पण तोपर्यंत तरी त्यांना पर्यायी जागा द्या.

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – पथारी होणार त्यावेळी त्यांना लायसेन्स देणार. स्टॉलचे रूपांतर पथारीमध्ये करणार आहोत. स्टॉलच्या बदल्यात त्यांना स्टॉलची जागा द्यावी लागणार आहे.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – ती आपण आखून देऊ.

मा. पृथ्वीराज सुतार – कधी देणार ते सांगा, कधी शिफ्ट करणार ते सांगा?

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – १५ दिवसात करून घेऊ.

मा. पृथ्वीराज सुतार – १५ दिवस कशासाठी लागतात, फक्त उचललेले स्टॉल तिथे ठेवायचे आहेत.

मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – आचारसंहिता असल्यामुळे करता येणार नाही. नवीन ठिकाणी आपण स्टॉल नेऊन ठेवायचे आहेत त्यामुळे आचारसंहितेनंतर करू.

मा. पृथ्वीराज सुतार – या ठिकाणी आचारसंहितेचा काय संबंध आहे?

मा. महापालिका आयुक्त – मतदान झाल्यानंतर आपण ते शिफ्ट करून घेऊ.

मा. रविंद्र धंगेकर – पर्यायी धोरण आहे की, स्टॉल उचलून नेल्यानंतर त्याला आपण पर्यायी जागा देतो.

मा. सौ. मोनिका मोहोळ – त्या ठिकाणी ओटा मार्केटचे आरक्षण असल्यावर ते करायलाच पाहिजे. त्यामध्ये आचारसंहितेचा काय संबंध आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – काहीही कारणे सांगून उपयोग नाही. आता तुम्ही बोलत आहात मागील ३ महिन्यात तुम्ही का केले नाही?

मा. महापालिका आयुक्त – माननीयांच्या विनंतीला मान देवून अशा ठिकाणी आपण शिफ्टींग केले असेल तर आपण सर्व अधिकाऱ्यांनी याची खबरदारी घेतली पाहिजे की, त्यांनी एखादा शब्द दिला असेल तर त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी आपण तात्काळ उचलली पाहिजे. एकदा माननीयांच्या म्हणण्यानुसार त्यांनी शिफ्ट केले असेल तर उद्या ते

म्हणणार की तुम्ही सांगितले म्हणून आम्ही शिफ्ट केले आणि आता तुम्ही का देत नाही? हे जे अधिकार द्यायचे आहेत ते तुम्ही आचारसंहितेनंतर ठराव केला तरी त्याला माझी काहीच हरकत नाही. हा फक्त अधिकार देण्यापुरता विषय आहे.
मा. रविंद्र धंगेकर – ते काम त्या काळात होणार नसेल तर कशासाठी अधिकार द्यायचे.
मा. महापालिका आयुक्त – करारनामे आपण आचारसंहितेनंतरच करणार आहोत.
मा. पृथ्वीराज सुतार – त्यामध्ये अजून ८ ते ९ स्टॉल राहिले आहेत. त्यामध्ये कोर्टाचा विषय आहे त्यात कोर्टाने कोणतीही बाजू न ऐकता एक्सपार्टे स्टे दिलेला आहे. आपल्याला त्याची माहिती नाही. आता मागील महिन्यात त्याची तारीख होती, आपण त्यावेळी काय बाजू मांडली की तो स्टे अजून २ महिने पुढे गेला.
मा. माधव जगताप, सहा.आयुक्त, घोले रोड – यामध्ये श्री. भिंगारे आणि इतर काहीजण अशी त्यांनी कोर्टात केस दाखल केलेली आहे. त्यासाठी आपण कोर्टात हजर राहण्यासाठी ॲड. चौधरी यांची नियुक्ती केलेली आहे आणि त्या केसमध्ये आपण ॲफिडेव्हिटही सादर केलेले आहे. त्यानंतर आपल्याला पुढील तारीख दिलेली आहे त्यावेळी ते स्टे व्हेकेट होवून आपल्याला पुढील कारवाई पूर्ण करता येईल. यामध्ये व्हायोलेशन वगैरे सर्व गोष्टी टाकल्या आहेत. त्यानंतर आपण ज्यावेळी स्टॉल उचलले त्यावेळी त्यांनी कोर्टाचा कंटेम्प्ट केलेला आहे, या सर्व गोष्टी आपण त्यामध्ये घातलेल्या आहेत.
मा. पृथ्वीराज सुतार – मग त्या १६ तारखेलाच कोर्टाचा स्टे उठायला पाहिजे होता, तो का उठला नाही?
मा. सौ. इधाटे, प्र. विधी सल्लागार – मा. अध्यक्ष, १६ मार्चला जेव्हा तारीख होती त्यावेळी आपण आपले डब्ल्यू.एस. दाखल करण्यासाठी होती. त्याप्रमाणे आपण खात्याकडून संपूर्ण माहिती घेऊन ते दाखल केलेले आहे. त्यानंतर तारखा देताना कोर्ट त्यांच्या ॲडजस्टमेंटप्रमाणे आणि त्यांच्यावर असलेल्या कामाचा लोड पाहून तारखा देत असते. त्यानंतर कोर्टाने आपल्याला पुढील तारीख अर्ग्युमेंट साठी दिलेली आहे त्यावेळी आपण अर्ग्युमेंट करून स्टे उठवण्याचा पूर्ण प्रयत्न करणार आहोत.
मा. पृथ्वीराज सुतार – पहिल्या वेळी कोर्टाने आपल्याला एक्सपार्टे स्टे दिलेला आहे, तो कसा काय दिला?
मा. सौ. इधाटे, विधी सल्लागार – कोर्टामध्ये केस दाखल केल्यानंतर आपल्याला नोटीस येण्याअगोदरच त्यांनी अर्ग्युमेंट करून केस एक्सपार्टे केली. आपण आपले म्हणणे मांडले आहे आणि आता अर्ग्युमेंट झाल्यानंतर तो स्टे उठून जाईल. आपण कितीही मेन्शन केले तरी कोर्ट त्यांच्या सोयीनुसार तारीख देतात.
**निर्णय – सदरचा विषय सर्वानुमते मान्य झाला.**

मा. पृथ्वीराज सुतार – मा. आयुक्तसाहेब, मध्यंतरी आम्ही आपल्याला आकाशचिन्ह परवान्यासंदर्भात पत्र दिले होते. शहरामध्ये दुकानदार किंवा व्यावसायिक किंवा इतर काहींचे जे नामफलक लावले जातात त्यासाठी आपण नवीन धोरणाप्रमाणे शुल्क आकारणी करतो आहे. त्यामध्ये त्या लोकांना मुदतवाढ द्या, अशी आम्ही आपल्याकडे मागणी केली होती, त्यावर आपण काय निर्णय घेतला आहे? हे शुल्क कोणी ठरवले?ते कायद्यानुसार आहे का? धोरण ठरविले आहे त्यावर आम्ही मुदतवाढीची मागणी केली होती त्यावर तुम्ही काही ठरविले आहे का? मुदतवाढ दिली पाहिजे कारण तुम्ही ३१ मार्च ही शेवटची मुदत दिली आहे आणि २८ आणि २९ तारखेला त्यांना नोटिसा दिलेल्या आहेत, त्यात आता सुट्टया आल्या होत्या, त्यामुळे तुम्ही त्यांना मुदतवाढ दिली पाहिजे आणि ती पेपरला डिक्लेअर करा.
मा. दहिभाते, उपायुक्त (वि.का.१) – मा. अध्यक्ष, हा जो विषय आहे की, त्या नामफलकाला एखाद्या दुकानाची जेवढी लांबी असेल आणि त्याची रूंदी ३ फुटापर्यंत असेल असा नामफलक फ्री दिलेला आहे, उर्वरीत जे ॲडिशनल नामफलक त्यांनी लावलेले असतील तर त्याला रक्कम २२२/– रू. चौ. फुटाने चार्ज करण्याबाबतचा हा विषय होता. यामध्ये मा. अति.महा.आयुक्त यांनी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे मा. सहा. आयुक्त यांची मिटिंग घेतली होती, त्यामध्ये त्यांना पूर्ण टाईम बाउंड टाईम आखून दिलेला होता. यामध्ये त्यांना १५/०२/२०१४ पर्यंत सर्वेक्षण करायचे होते आणि २८/०२/२०१४ पर्यंत सूचना म्हणजे नोटिसा द्यायच्या होत्या, १/०३/२०१४ ते १५/०३/२०१४ पर्यंत सर्व नोटिसा वाटप करायच्या होत्या आणि ३१/०३/२०१४ पर्यंत त्यांच्याकडून नामफलकाचे शुल्क वसूल करण्याबाबतचे आदेश संबंधितांना दिलेले होते, त्यानुसार पूर्तता चालू आहे.
मा. पृथ्वीराज सुतार – त्याप्रमाणे त्यांना १ महिन्यापूर्वी नोटिसा मिळालेल्या आहेत का?
मा. दहिभाते, उपायुक्त (वि.का.१) – त्यामध्ये त्यांचे १ महिन्यापर्यंतच्या नोटिसा जवळजवळ निम्म्याहून जास्त काम झालेले आहे.
मा. पृथ्वीराज सुतार – त्यांना शुल्क भरण्यासाठी मुदतवाढ द्यावी.
मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – मा. अध्यक्ष, महानगरपालिकेच्या चालू वर्षाचे एकंदरीत उत्पन्नाचे स्त्रोत आपल्याला वाढवायला लागणार आहेत. या अनुशंगाने जेव्हा आपण जाहिरात शुल्क रक्कम रू. २२२/– केले. त्या बदल्यात जाहिरातींचे जे होर्डिंग्ज आहेत, त्याचे शुल्क घेत असताना बरेच ठिकाणी काही मॉल्स असो किंवा व्यावसायिकांना जे रेट आहेत त्यामध्ये नामफलकाच्या अनुशंगाने आपण रूल्सप्रमाणे ते शुल्क घ्यावे. त्यामध्ये आपण जर एखादा व्यावसायिक असेल त्याच्यासाठी त्याची जी स्ट्रीप किंवा साईज असेल ती आपण आयडेंटीफाय केली ती सोडून जर जास्त मोठया प्रमाणावर नामफलक करून इतर कुठल्या गोष्टींची जाहिरात करत असेल तर ...

मा. पृथ्वीराज सुतार – आम्ही तुम्हांला ते शुल्क आकारू नका असे म्हणत नाही, आम्ही फक्त त्यांना मुदतवाढ द्या असे सांगतो आहे. कारण लोकांना विषय कळलेला नाही आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे की, दोन दिवसापूर्वी नोटीस मिळालेली आहे आणि रक्कम रू. २२२/– प्रमाणे रक्कम भरा नाहीतर, १ तारखेपासून तुमच्याकडून ५ पट दंड वसूल केला जाईल असे सांगितले आहे. तुम्ही त्यांच्याकडून पैसे घ्या असे म्हणत नाही उलट आपले उत्पन्नच वाढणार आहे पण त्यांना मुदतवाढ द्या एवढेच आमचे म्हणणे आहे. त्या मुदतवाढीमध्ये त्यांनी भरले नाहीतर मात्र तुम्ही तुमच्या नियमाप्रमाणे जे ठरले असेल त्यानुसार ५ पट दंड वसूल करा.

मा. अति.महा.आयुक्त (इ) – अशा प्रकारचा विषय पहिल्यांदाच येतो आहे आणि अशा प्रकारचे शुल्क आपण प्रथमच लावतो आहे, हे शुल्काच्या दृष्टिकोनातून १८ जानेवारीला आपल्याकडे जे पत्रक आले होते ते केंद्रीत न करता आपण प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्याला अशी जबाबदारी दिलेली होती त्यासाठी टाईम बाउंड शेडयूल दिलेला होता, परंतू त्यांच्याकडे असलेल्या कामाच्या अनुशंगाने टायमिंगला त्या–त्या व्यक्तीला अशा प्रकारची नोटीस वेळेत देता आली नसेल पण त्यांच्यावर जी काही रक्कम असेल ती त्यांना भरावीच लागेल.

मा. पृथ्वीराज सुतार – आम्हांला मान्य आहे, त्या लोकांना कामाचा व्याप असेल, इलेक्शन डयूटी असेल आणि हा विषय यावर्षी प्रथमच असल्यामुळे आणि लोकांना तो माहिती नसल्यामुळे आपण या वर्षी त्यांना २ महिन्यांची मुदतवाढ द्यावी, पुढील वर्षी तुम्ही रेग्यूलर करा एवढेच आमचे म्हणणे आहे.

मा. अति.महा.आयुक्त (इ) – आताच्या विषयाच्या अनुशंगाने आपल्याकडे अस्तित्वात असलेले जे बोर्डधारक असतील त्यांनी ठराविक कालावधीपर्यंत रक्कम भरली, तर त्याला आपण दंड करतो. त्यामुळे काही वेळा प्रशासकीय दृष्टीकोनातून जर आपल्याकडून काही अडचण झाली असेल तर ते शुल्क किंवा दंड त्या व्यक्तीवर पडू नये आणि जर काही हलगर्जीपणा झाला असेल तर त्याची निश्चितपणे जबाबदारी आपली आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – ते कारण काहीही असो पण ती जबाबदारी आपली आहे कारण आपण ते वेळेत दिले नाही.

मा. अति.महा.आयुक्त (इ) – आपल्याला त्या पिरेडकरीता ३१ मार्चनंतर २ महिने मुदत वाढवून घेतो.

मा. पृथ्वीराज सुतार – २ महिने मुदतवाढ द्या आणि कोणत्याही प्रकारचा दंड आकारू नका. आम्ही म्हणतो २ महिने करा परंतू तुमच्या नियमाप्रमाणे मुदतवाढ ठरवा.

मा. अध्यक्ष – हा उत्पन्नाचा विषय आहे. आपल्याला आचारसंहितेची या विषयाला काही अडचण आहे का?

मा. अति.महा.आयुक्त (इ) – आपण नवीन काही करत नाही. यासाठी टाईम बाउंड पिरेड आहे त्याच्या पुढे गेले तर त्याला दंडाची रक्कम असते.

मा. अध्यक्ष – आता तसेही या विषयाला उशीर झालेला आहे तर हा विषय आचारसंहितेनंतर केला तर काय अडचण आहे.

मा. अति.महा.आयुक्त (इ) – मा. स्थायी समितीचा जो निर्णय झाला आहे त्याच्या अनुशंगाने त्याप्रमाणे आपण कार्यवाही करू असे त्यांचे अंडरटेकींग घेवून त्यांना रिन्यूअल देऊ. कारण हा फक्त दंडाचा विषय आहे.

विषय क्र. – १८

मा. दहिभाते, उपायुक्त (वि.का.१) – मा. अध्यक्ष, हा होर्डिंग्जबद्दलचा विषय आहे त्याचे वर्षभराचे दोन सहामाहीमध्ये ॲडव्हान्समध्ये पैसे घेतले जातात. आता आपण जो विषय आणला आहे तो जाहिरात नियमावलीनुसार अटीशर्तीवर मान्य केलेले जे बोर्ड होते त्याची पूर्तता जाहिरातदारांनी ३०/०९ अखेरपर्यंत करणे अपेक्षित होते आणि त्याचा रिपोर्ट त्या–त्या क्षेत्रीय कार्यालयात देणे आवश्यक होते. बऱ्याच जणांनी पूर्तता करून जाहिरात नियमावलीच्या साईजनुसारच बोर्ड केलेले होते आणि तसे रिपोर्टही त्यांनी सादर केले होते. परंतू काही पूर्तता अहवाल सादर करण्याचे काही कारणास्तव म्हणजे काही बदल्यांमुळे करण्याचे राहून गेले होते, ते करण्यासाठी वेळ लागला. त्यामुळे ३०/०९/२०१३ ते ३१/०३/२०१४ अखेर ६ महिन्यांचे चलन देण्याचे काम प्रलंबित राहिले ही वस्तुस्थिती आहे परंतू जाहिरात नियंत्रण नियमावलीनुसार जाहिरात शुल्क हे अग्रीम भरून घेत असल्या कारणाने त्यांना चलन देणे क्रमप्राप्त होते. आता हा जो प्रस्ताव आणला आहे त्यामध्ये ज्यांनी वेळेत पूर्तता केली नाही त्यांना दंड आणि ज्यांनी वेळेत पूर्तता केली त्यांना विनादंड. हा विषय पुढे भविष्यात आक्षेपामध्ये निघत असल्या कारणामुळे हा विषय या ठिकाणी मान्यतेसाठी आणला आहे.

मा. अध्यक्ष – जर हा विषय आचारसंहितेत बसत असेल तरच हा तुम्ही आमच्याकडून मान्य करून घ्या नाहीतर पुढे प्रॉब्लेम यायला नको.

मा. जोशी, उपायुक्त (जनरल) (सेवकवर्ग) – हे रेव्हेन्यू कलेक्शन आहे आणि आपण रेट रिवाईज करत नाही, रेट जुनेच आहेत त्यामुळे तशी काही अडचण येणार नाही.

मा. पृथ्वीराज सुतार – हा विषय तुम्ही शहरातील सर्व बोर्डसाठी सांगत आहात.

मा. अति.महा.आयुक्त (इ) – हो, परंतू यापैकी जास्तीत जास्त संख्या ही ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालयाची आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – तेथील स्टाफकडून उशीर कसा काय झाला?

मा. दहिभाते, उपायुक्त (वि.का.१) – ढोले पाटील रोडचे साधारण १०६ होते. मध्यंतरीच्या काळात स्टाफच्या ज्या बदल्या १–१ महिन्याने होत होत्या त्या काळात ती प्रकरणे तशीच राहिली आणि कार्यवाही करणे राहून गेले. हा विषय फायद्यासाठीच केला होता. यामध्ये आपल्याला साधारण ११ कोटी रूपये येणे अपेक्षित होते परंतू यामधून आपल्याला १४ कोटी रूपये उत्पन्न मिळालेले आहे.

मा. पृथ्वीराज सुतार – या कामासाठी आमच्याकडे माणूस नाही.

मा. दहिभाते, उपायुक्त (वि.का.१) – मा. सभासदांच्या वॉर्डात वारजे आणि कोथरूड मिळून एकजण आहे परंतू काही दिवसातच एका माणसाची ऑर्डर निघून तो माणूस आपल्याला सेपरेट मिळेल.

मा. पृथ्वीराज सुतार – वर्षभरात एकदाच शुल्क घ्या, त्यासाठी दोन सहामाही करू नका.

मा. अध्यक्ष – आपली यंत्रणाही डबल राबवावी लागते.

**निर्णय – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

मा. पृथ्वीराज सुतार – मा. अध्यक्ष, आपल्याला एल.बी.टी. आणि प्रॉपर्टी टॅक्सचे उत्पन्न किती मिळाले? आणि त्याचे टारगेट किती होते?

मा. निकम, करआकारणी व करसंकलन प्रमुख – मा. अध्यक्ष, प्रॉपर्टी टॅक्सचे ७४२ कोटीचे टारगेट होते ते ७५२ कोटी झाले आहे.

मा. कानडे, सहआयुक्त तथा एल.बी.टी. प्रमुख – मा. अध्यक्ष, एल.बी.टी. चे १२३० कोटी झालेले आहेत आणि १६५७ कोटीचे टारगेट होते.

मा. महापालिका आयुक्त – आपण कुठे कमी पडलो आहोत का?

मा. जगताप, अति.महा.आयुक्त (इ) – कमी नाही, मा. आयुक्तांच्या बजेटमध्ये १३०० कोटी रूपये ऑक्ट्रायसाठी टारगेट दिले होते आणि मा. स्थायी समिती आणि मा. मुख्यसभेने १६०० कोटीचे दिले होते.

मा. पृथ्वीराज सुतार – दोन्ही अधिकाऱ्यांनी चांगला प्रयत्न केला आहे त्यामुळे मी दोन्ही अधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो.

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा संपन्न करण्यात आली.

sd/-
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**